गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*

श्री. संजय काठेड (संस्थापक)
Mo. 9372444001
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर.
फोन नं. : 0241-2993900



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बालाजी देडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १०.०५.२०२५ | अंक नं. ३४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

MAHAVIR GROUP
YOUR VISION, OUR REALTY

## पितृतुल्य

# आधारवड

## स्व. आ. अरूणकाका जगताप

### भावपूर्ण श्रध्दांजली

आपले आशीर्वाद आणि प्रेरणा आम्हाला सदैव मार्गदर्शन करतील.

शोकाकुल - श्री. राजेश संतोष भंडारी



Design Addict




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा | व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





Shiv Tattwa
Yogpeeth

KIDS YOGA SUMMER CAMP

A week full of fun, flexibility, and creativity! Let your child explore the joy of movement, mindfulness, and more!

Activities Include:
- Yoga, Chair, Wheel, Rope Yoga
- Art & Craft | Colouring & Painting
- Fireless Cooking | Abacus

12TH - 19TH MAY 2025
10 AM TO 2 PM

Age Group: 4 to 15 Years

96151 61515

Keshar villa, Sadhana Society, Professor colony chowk, Savedi, A.Nagar.



रजि नं. ११४३९-५७/३७ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १०.०५.२०२५ | अंक नं. ३४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रिडा, सांस्कृतिक, राजकीय, अध्यात्मिक आदी क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे माजी नगराध्यक्ष, विधान परिषदचे माजी सदस्य

# अरुणकाका जगताप

यांना भावपूर्ण

# श्रध्दांजली



••● दुःखांकित ●••

**प्रदिप हरिभाऊ बोरूडे** (कॉन्ट्रॅक्टर)
हॉटेल पंचमी परमिट रुम अ‍ॅण्ड बिअर बार

**अंबादास रामदास चौधरी**
(गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर)

* दशक्रिया विधी *
रविवार ११ मे २०२५ रोजी सकाळी ७ वा.
अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर



पेशवाई | श्रीमंत

सर्जेपुरा, अहिल्या नगर. 0241 2325002/3/4



## वधू वराच्या बस्त्या च्या खरेदी वर रु. 10,000/-* पर्यंत रेडीमेड, सूटिंग शर्टिंग फ्री.

ऑफर 25 मे पर्यंत वैध.

महाराष्ट्राची महावस्त्र परंपरा

आयुष्यातील प्रत्येक शुभप्रसंगी वस्त्ररुपात आम्ही असतो तुमच्या परिवारा सोबत!

पैठणी ❖ पारंपारिक सारिज ❖ डिझायनर सारिज
ब्रँडेड रेडीमेड्स ❖ सूटिंग ❖ शर्टिंग ❖ एथेनिक ❖ अ‍ॅक्सेसरीज

लग्न बस्त्या ची खास सोय.

/peshwaishrimant | www.peshwaishrimant.com

सर्जेपुरा, अहिल्या नगर. 0241 2325002/3/4

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १४ (६+४+४) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १०.०५.२०२५ | अंक नं. ३४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



















अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय

## स्व. अरुणकाका जगताप

आपल्या पावन स्मृतीस

## भावपूर्ण श्रध्दांजली!

: शोकाकूल :

धीरज पंडितराव खैरे — दत्तात्रय पंडितराव खैरे

शरद पंडितराव खैरे — यशराज धीरज खैरे

दशक्रिया विधी : रविवार दि.११ मे रोजी सकाळी ७.०० वाजता

स्थळ : अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर

## आमचे आधारवृक्ष हरपलं...



अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय

### स्व. अरुणकाका जगताप

आपल्या पावन स्मृतीस

### भावपूर्ण श्रध्दांजली!

दशक्रिया विधी : रविवार दि.११ मे रोजी सकाळी ७.०० वाजता * स्थळ : अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर

* दुःखांकित *

श्रीकांत बाळासाहेब देशमुख । ओंकार बाळासाहेब देशमुख

गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर

मे. ओम साई कन्स्ट्रक्शन, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१



### बहुआयामी विज्ञानयात्री

जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ अब्लर्ट आईनस्टाईन असे म्हणत असे की, ''बुद्धीमत्ता ज्ञानात नसते तर कल्पनाशक्तीत असते. पण व्यक्तिमत्त्व हे त्या कल्पनांना प्रत्यक्ष कृतीत आणण्याच्या क्षमतेत असते.''

नुकतेच देहावसान झालेले इस्त्रोचे माजी अध्यक्ष डॉ. कृष्णास्वामी कस्तुरीरंगन नावाचे व्यक्ती व त्यांनी केलेले कार्य हे आईनस्टाईनच्या वरील व्याख्येशी समर्पक ठरते. बहुआयामी, चतुरस्त्र यासारखी विशेषणे अनेक व्यक्तिमत्त्वांना दिली जातात. पण कस्तुरीरंगन यांचा बहुआयामीपणा हा व्यापक होता.

अवकाश, संशोधन, खगोलशास्त्र, पर्यावरण, शिक्षण यासारख्या क्षेत्रातील त्यांच्या ज्ञानसाधनेचे गहिरेपण त्यांनी केलेल्या शिफारशी व धोरणांतून स्पष्टपणे प्रतीत होते.

डॉ. कस्तुरीरंगन यांनी भारतीय अवक्श विज्ञानक्षेत्राला आंतरराष्ट्रीय उंचीवर नेले. आत्मनिर्भर, अवकाश कार्यक्रमात त्यांना मोलाचा वाटा आहे.

भास्कर १-२ उपग्रह प्रकल्प उभारणी, इन्सॅट २, मैलाचा दगड ठरलेल्या चांद्रयान-१ चे यशस्वी प्रक्षेपणही त्यांच्याच नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

केवळ विज्ञान-तंत्रज्ञानापुरते त्यांचे योगदान मर्यादित नव्हते. भारताच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आराखडा तयार करणाऱ्या समितीचे ते अध्यक्ष होते. त्यांनी शालेय अभ्यासक्रमांपासून उच्च शिक्षणापर्यंत संपूर्ण शिक्षण प्रक्रियेत मुलभूत बदलांची शिफारस केली.

भारताला ज्ञानाधिष्ठित महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहात त्यादृष्टीने ते सतत कार्यरत राहिले. पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण या तिन्ही सर्वोच्च नागरी सन्मानांनी गौरवलेल्या डॉ. कृष्णास्वामी कस्तुरीरंगन यांच्या कार्यकर्तृत्वाला सलाम.

(संदर्भ- प्रा. विजया पंडित)

# जुन्या कलेक्टर ऑफिस परिसरात नागरी सुविधांचा उडाला बोजवारा

## समस्यांचे तातडीने निवारण करा अन्यथा उपोषण करण्याचा महानगरपालिका आयुक्तांना नागरिकांचा इशारा

नगर - नगर शहरातील जुन्या कलेक्टर ऑफिस परिसरातील नागरी सुविधांचा बोजवारा उडाला असून, त्याचे तातडीने निवारण करावे अन्यथा उपोषण करण्याचा इशारा नागरिकांच्यावतीने देण्यात आला आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्ष अलतमश जरीवाला यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त व घनकचरा विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून समस्या सोडवण्याकरिता निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्र. ११ मध्ये बाबा बंगाली या भागात अनेक शासकीय कार्यालय, शाळा व धार्मिक स्थळे असल्याने येथे नागरिकांची मोठी वर्दळ असते. येथील स्थानिक नागरिकांनी साठलेला कचरा व तुंबलेली गटारी याबाबत अनेक वेळा तक्रारी केल्या होत्या. परंतु आजपर्यंत या समस्या सोडविण्यात न आल्याने येथे कचऱ्याचे ढिग जमा होत आहे. मागील काही महिन्यांपासून घंटागाडी येणेही बंद झाले आहे, त्यामुळे कचरा रस्त्यामध्ये पडला पडून आहे.



बाबा बंगाली येथील नागरी सुविधेबाबत नागरिकांच्यावतीने महापालिकेला निवेदन देण्यात आले.

यावेळी रफिक सय्यद म्हणाले, रस्त्याच्या साईडला असलेल्या उघडी गटारीची साफसफाईही होत नाही. या गटारी उघड्या असल्याने अनेक नागरिक व प्राणी त्यामध्ये पडून जखमी होतात. पावसाळा सुरू होण्यापूर्वी गटारीवर सिमेंटचे झाकण टाकून ते बंद करून होणारे अनर्थ टाळावेत.

यावेळी मुफ्ती अल्ताफ अहमदनगरी म्हणाले, येथील स्थानिक नागरिक व लहान मुलांना मोठ्या प्रमाणावर आरोग्याचा धोका निर्माण होऊन आजाराला सामोरे जावे लागत आहे. या भागात डेंग्यू, मलेरिया व टायफाईडचे अनेक रुग्ण आहेत. याची तातडीने दखल घेऊन या समस्यांपासून स्थानिक नागरिकांना कायमस्वरूपी समस्यामुक्त करावे.

निवेदन देताना मुफ्ती अल्ताफ अहमदनगरी, हाजी सलीम खान, रफिक सय्यद, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे कार्याध्यक्ष रियाज कुरेशी, उपाध्यक्ष परवेज शेख, मुस्सू मोमीन, माझेन मिर्झा, वसीम मोमीन, कैफ शेख उपस्थित होते.

# अक्कलकोट ते देवल गाणगापूर रस्ता तातडीने दुरुस्त करावा

नगर - महाराष्ट्रातील अक्कलकोट व कर्नाटकातील गाणगापूर या दोन्ही तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी भाजपचे विनायक देशमुख यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली.

पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पा. यांच्या देह वेचावा कारणी या आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशन कार्यक्रमासाठी ना. गडकरी लोणी येथे आले होते. त्यावेळी श्री. देशमुख यांनी या संदर्भातील निवेदन त्यांना देऊन हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची मागणी केली.

निवेदनात श्री. देशमुख यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रातील अक्कलकोट आणि कर्नाटकातील गाणगापूर ही दोन्ही क्षेत्रे दत्त सांप्रदायातील लोकांची श्रद्धास्थाने आहेत. महाराष्ट्रातून दररोज हजारो लोक या तीर्थस्थळांना भेट देतात. अक्कलकोट ते गाणगापूर हे अंतर केवळ ७४ किलोमीटर आहे. मात्र या प्रवासासाठी दोन तासापेक्षा जास्त वेळ लागतो. रस्त्याची सद्यस्थिती पाहता या रस्त्यावरून ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि स्त्रिया यांना प्रवास करणे अत्यंत त्रासदायक ठरते. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे असल्यामुळे नेहमी अनेक वाहने बंद पडल्याचे दिसून येते. ही परिस्थिती लक्षात घेऊन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने यात लक्ष घालावे आणि हा रस्ता तातडीने दुरुस्त करावा.



विनायक देशमुख यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. यावेळी उपस्थित असलेले पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आ. शिवाजी कर्डिले आदी.

ना.नितीन गडकरी यांनी या मागणीची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत त्वरित कार्यवाही करण्याची सूचना केली.

यावेळी जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा., आ. शिवाजीराव कर्डिले व भाजपाचे सदा देवगावकर उपस्थित होते.

## शोरुम समोरून मोटारसायकलची चोरी

नगर - रस्त्याच्या कडेला हॅन्डल लॉक करुन लावलेली हिरो कंपनीची एच एफ डीलक्स मोटार सायकल (क्र.एम एच १६ बी एफ २८५७) चोरट्याने चोरुन नेली. ही घटना ८ मे रोजी सकाळी १० ते १०.३० या कालावधीत नगर-पुणे रोड वरील इलाक्षी शोरुम समोर घडली. या प्रकरणी राजाराम भाऊसाहेब लोटके (वय ५३, रा.खंडाळा ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गोळी घालून युवकाची हत्या, आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

नगर - अटकपूर्व जामीन मंजूर झाल्याच्या रागातून योगेश एकनाथ जाधव (वय २३, रा. कामत शिंगवे, ता. पाथर्डी) या युवकाची त्याच्या घरी जाऊन डोक्यात गोळी घालून हत्या करणाऱ्या आरोपी पोपट गणपत अदमाने (रा. जवखेडे दुमाला, ता. पाथर्डी) याला जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. यासोबतच न्यायालयाने आरोपीला दहा हजार रुपयांचा दंडही ठोठावला आहे.

ही धक्कादायक घटना २४ नोव्हेंबर २०१८ रोजी पाथर्डी तालुक्यातील कामत शिंगवे येथे घडली होती. आरोपी पोपट आदमने याने एकनाथ जाधव यांच्या घरी जावून त्यांचा मुलगा योगेश याच्या डोक्यात बंदुकीने गोळी मारुन त्याला ठार मारले. तसेच एकनाथ जाधव, वसंत खाटीक, नंदा जाधव, दीपक जाधव यांना देखील तलवारीने मारुन जखमी केले व त्यांच्या खुनाचा प्रयत्न केला. या प्रकरणी एकनाथ जाधव यांच्या फिर्यादी वरून पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन पोलीस निरीक्षक रमेश रत्नपारखी यांनी या गुन्ह्याचा तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

या खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने एकूण १७ साक्षीदारांची साक्ष नोंदवली. यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि फिर्यादी एकनाथ जाधव यांची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली. न्यायालयात सादर करण्यात आलेल्या पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपी पोपट अदमाने याला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. सरकारी पक्षाच्या वतीने विशेष सरकारी वकील जी. के. मुसळे यांनी युक्तिवाद केला. त्यांना ॲड. निखिल मुसळे यांनी सहकार्य केले. तसेच पैरवी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक महेश जोशी, पोलीस अंमलदार अण्णासाहेब चव्हाण, अरविंद भिंगारदिवे यांनी सहकार्य केले.

# लुटमारीसाठी प्राध्यापकाला लोखंडी पुलावर अडवून चाकुने हल्ला करणाऱ्या दोघांना पोलिसांनी पकडले

नगर - रस्त्याने पायी चाललेल्या प्राध्यापकाला स्टेशन रोडवरील लोखंडी पुलावर लुटमारीच्या उद्देशाने अडवून त्यांच्यावर चाकु हल्ला करणारे २ आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहेत. प्रविण राजु चांदणे (वय १९) व राहुल राजू भोसले (वय २०, दोन्ही रा.सारडा कॉलेजमागे, सिध्दार्थनगर, अहिल्यानगर) अशी या आरोपींची नावे आहेत.

याबाबतची माहिती अशी की, निखील विकास बोरकर (वय ३४, रा.पुसद, जि.यवतमाळ) हे कुटुंबियांना भेटण्यासाठी अहिल्यानगर येथे आले असताना ६ मे रोजी पहाटे ३.४५ च्या सुमारास श्वसनाचा त्रास झाल्याने ते घराबाहेर आले. बोरकर हे रेल्वे स्टेशन रोडने लोखंडी पुलावरून जात असताना अज्ञात तीन आरोपी मोपेडवरून येऊन त्यांनी फिर्यादीस आडवून खिसे तपासून पैसे न मिळाल्याने फिर्यादीकडील मोबाईल हिसकावून घेण्याचा प्रयत्न करत असताना फिर्यादीने प्रतिकार केला.त्यावेळी आरोपींनी चाकुने त्यांचे हातावर, पाठीवर वार करून पळून गेले. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात जबरी चोरीच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल आहे.



लुटमारीसाठी प्राध्यापकाला लोखंडी पुलावर अडवून चाकुने हल्ला करणाऱ्या दोघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

या गुन्ह्याचा समांतर तपास करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांनी पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, शाहीद शेख, विजय ठोंबरे, रोहित येमुल, रोहित मिसाळ, मयुर गायकवाड, सुनिल मालणकर, प्रशांत राठोड यांचे पथक नेमले होते. सदर पथक ९ मे रोजी गोपनीय माहिती व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयाचा तपास करत असताना सदरचा गुन्हा प्रविण चांदणे याने त्याचे दोन साथीदारासह केला असून ते सध्या सिध्दार्थनगर येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सिध्दार्थनगर येथे जाऊन संशयीतांचा शोध घेऊन ते मोपेड गाडीवर असताना प्रविण राजु चांदणे व राहुल राजू भोसले यांना ताब्यात घेतले. तर त्यांचा साथीदार गणेश विजय लोमटे (रा.प्रेमदान हाडको, अहिल्यानगर) हा फरार झाला. या आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली टीव्हीएस कंपनीची विना क्रमांकाची मोपेड जप्त करण्यात आली. आरोपींना पुढील तपासासाठी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## जालिंदर चव्हाण यांचे आकस्मिक निधन

नगर - नगर तालुक्यातील अकोळनेरच्या जाधव वाडीतील गारुडकर मळा येथील रहिवासी जालिंदर विठ्ठल चव्हाण (वय ३८) यांचे ९ मे रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर गारुडकर मळा येथे दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

मयत चव्हाण यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, भाऊ, भावजय असा परिवार आहे.

## बालिकाश्रम रोडवर विजेचा शॉक बसून तरुणाचा मृत्यू

नगर - विजेचा शॉक बसून मंदिराच्या कंपाउंडच्या तारेवर पडून बेशुद्ध पडलेल्या तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची घटना बालिकाश्रम रोड वरील शिव गोरख मंदिर येथे ८ मे रोजी रात्री ८.५० वाजण्याच्या सुमारास घडली. योगेंद्र उमेश जाधव (वय २२ वर्षे, रा. शिंदे मळा, बालिकाश्रम रोड, अ.नगर) असे मयत तरुणाचे नाव आहे.



योगेंद्र जाधव (मयत)

या बाबतची माहिती अशी की योगेंद्र जाधव हा तरुण बालिकाश्रम रोडवरील शिव गोरख मंदिरात गेला असता त्याला तेथे विजेचा शॉक बसला. त्यामुळे तो अचानक मंदिराच्या कंपाऊंडच्या तारेवर पडून बेशुद्ध झाला. त्यास औषधोपचाराकरीता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास तपासून तो उपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे घोषित केले.

या प्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बोठे यांनी दिलेल्या अहवालावरुन तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. योगेंद्र याच्यावर ९ मे रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई, भाऊ, भावजय, १ बहिण असा परिवार आहे. हेमंत जाधव यांचे ते लहान बंधू होत.

# भावी पिढी 'थॅलेसेमियामुक्त' करण्यासाठी विवाहपूर्व तपासणी करणे अत्यंत आवश्यक

## सतीश इंदानी यांचे प्रतिपादन; जनकल्याण रक्तकेंद्र व अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशनच्या वतीने जागतिक थॅलेसेमिया दिनी सायकल रॅलीचे आयोजन

नगर - थॅलेसेमिया मुक्त भारत करण्यासाठी जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने प्रबोधनात्मक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. थॅलेसेमिया आजारापासून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विवाहपूर्वी लग्नाच्या आधी तपासणी करणे आवश्यक आहे. थॅलेसेमिया हा आई वडिलांकडून मुलांना होणारा अनुवंशिक आजार आहे. जर आई-वडील दोघेही थॅलेसेमिया कॅरीअर असतील तर होणारे मूल थॅलेसेमिया बाधित असण्याची शक्यता २५% असते. थॅलेसेमिया या आजारा विषयी समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. भावी पिढी थॅलेसेमिया मुक्त करण्यासाठी विवाहपूर्व तपासणी आवश्यक आहे, असे प्रतिपादन जनकल्याण रक्त केंद्राचे कार्यवाह सतीश इंदानी यांनी केले आहे.



नालेगाव येथील जनकल्याण रक्तकेंद्र व अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने थलेसेमिया जनजागृती अभियान अंतर्गत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

नालेगाव येथील जनकल्याण रक्तकेंद्र व अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने थलेसेमिया जनजागृती अभियान अंतर्गत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या सायकल रॅलीची सुरुवात नालेगाव, जनकल्याण रक्तकेंद्र येथून करण्यात आली. याप्रसंगी जनकल्याण रक्तकेंद्राचे कार्यवाह सतीश इंदानी, सहकार्यवाहक आदित्य चांदेकर, संचालक रुपेश भंडारी, जनकल्याण रक्तकेंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे, स्मिता बडवे, जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर, सोनाली खांडरे, शरद बळे, गजेंद्र सोनवणे, डॉ.गौरी जोशी, डॉ.हर्ष शाह, अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रशेखर मुळे (काका), उपाध्यक्ष नितीन पाठक, कार्याध्यक्ष मनोज येनगंदुल, सचिव अमोल कुलकर्णी, खजिनदार केतन बलदोटा, सदस्य नागेश धसाळ, प्रसाद भंडारी, श्रीकांत वंगारी, थॅलेसिमिया बालक व पालक राजू डहाळे, प्रेम कल्याणी, किशन कल्याणी, पोपट बेल्हेकर, अनिल सुराणा, विष्णु बनसोडे, कल्याण बागरेचा, भरत झंवर, हरविंदर नारंग, दत्ता भालेराव, सत्यनारायण पुरोहित, संदीप ससे, हरिश्चंद्र थिगळे, विनिता धामणगावकर, योगीराज अरवेल, गीता गाडेकर, जनार्दन मडुर, अमित टकले आदी कर्मचारी उपस्थित होते.

सायकल रॅलीचा मार्ग पुढील प्रमाणे जनकल्याण रक्तकेंद्र, नेप्ती नाका, दिल्लीगेट, बालिकाश्रम रोड, प्रेमदान चौक, प्रोफेसर चौक, आकाशवाणी, सावेडी जॉगिंग पार्क, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड, एकवीरा चौक, श्रीराम चौक, गुलमोहर रोड पोलीस चौकी, सुरभी हॉस्पिटल, डीएसपी चौक, स्टेट बँक चौक, स्टेशन रोड, बस स्टँड, जुना टिळक रोड, अमरधाम रोड, जनकल्याण रक्तकेंद्र येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

सायकल रॅलीचे स्वागत भिस्तबाग चौक व श्रीराम चौकात करण्यात आले. यावेळी डॉ.दिलीप धनेश्वर, डॉ.पंकज शाह, वनवासी कल्याण आश्रमाचे अनंत पुंड, अविनाश धामणगावकर, विचार भारतीचे डॉ.मनोहर देशपांडे, उदय भणगे, राजेश परदेशी, नीलम परदेशी यांनी स्वागत केले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी डॉ.रोहित करांडे यांनी थॅलेसेमिया आजाराविषयी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ.विलास मढीकर यांनी केले. आदित्य चांदेकर यांनी जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने थॅलेसेमिया रुग्णांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. तसेच वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात अशी माहिती दिली. प्रशासकीय अधिकारी सागर उंडे यांनी आभार मानले.

# गृहिणी

## आरोग्य

### रोज खा पपईच्या बिया

पपईच्या बिया खाणे अनेक प्रकारे आरोग्यासाठी फायद्याचे आहे. पपईच्या बियांमध्ये फायबर, निरोगी फॅटी ॲसिड्स् आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे वजन कमी करण्यास, पचन सुधारण्यास, आणि रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यास मदत करतात. पपईच्या बिया खाल्ल्याने शरीरातील चरबी जाळण्यास मदत होते आणि वजन कमी करण्यास मदत होते. बियांमध्ये फायबर जास्त असल्याने पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता कमी होते. रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण मिळविता येते. पपईच्या बिया रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करतात. बियांमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. पपईच्या बिया त्वचेसाठी देखील फायद्याच्या असतात, त्या त्वचेला उजळ करतात आणि वृद्धत्वाला प्रतिबंध करतात.

## पाककला

### अमृतसरी छोले

**साहित्य :** ३०० ग्रॅम काबुली चणे, २५० मी.ली थोडे पाणी, वेलची, २ चम्मच डाळिंबाचे दाणे, १/२ टीस्पून आंबा पावडर, १ टीस्पून आले लसूण पेस्ट, ४ हिरव्या मिरच्या, चवीनुसार मीठ, अर्धा टीस्पून धने पावडर, १/२ टीस्पून लाल तिखट, १ टीस्पून हळद, १/२ टीस्पून गरम मसाला, १ ते १/२ कप पाणी, २ चम्मच तूप गरम, २ कांदे, २ तमालपत्र, २ टोमॅटो,

**कृती :** सर्वप्रथम भिजवलेले चणे (८-१० तास) काढून चांगले धुवावेत. पुन्हा काढून टाका आणि एका खोल पॅनमध्ये स्थानांतरित करा. थोडे पाणी आणि वेलची घाला. मध्यम आचेवर ठेवा आणि चणे पुरेसे मऊ होईपर्यंत ३० ते ४० मिनिटे उकळवा. सुमारे २ ते ३ कप पाणी राखून चणे पुन्हा काढून टाका. डाळिंबाचे दाणे, आंबा पावडर, आले लसूण पेस्ट, हिरव्या मिरच्या, मीठ, धने पावडर, लाल तिखट, हळद आणि गरम मसाला पावडर ब्लेंडरमध्ये एकत्र करा. हे सर्व साहित्य एकत्र बारीक करून घ्या. सुमारे १ ते ११/२ कप पाणी घाला आणि गुळगुळीत पेस्टमध्ये मिसळा. नंतर मध्यम आचेवर पॅन गरम करा. चणे आणि ग्राउंड पेस्ट घाला. नीट मिक्स करून बाजूला ठेवा. एका छोट्या फ्राईंग पॅनमध्ये तूप गरम करा. कांदे सोनेरी तपकिरी होईपर्यंत कांदे आणि तमालपत्र परतून घ्या. टोमॅटो घालून चांगले परता. राखीव पाण्यासोबत हे चण्यामध्ये घाला. एक उकळी आणा आणि ग्रेव्हीमध्ये थोडेसे पाणी येईपर्यंत शिजवा. चिरलेल्या कांदे कोथिंबीरीसोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### घरात येतात का काळ्या मुंग्या?

* घरात काळ्या मुंग्यांचे आगमन हे धन, आनंद आणि समृद्धीचे लक्षण आहे. शास्त्रांनुसार, जर घरात पूर्वेकडे मुंग्या अन्न घेऊन जाताना दिसल्या तर येणाऱ्या काळात धनलाभ होण्याचे संकेत आहेत.

* तुम्ही कदाचित लक्षात घेतले असेल की काही लोक पैशाचा ओघ वाढवण्यासाठी त्यांच्या घराच्या उत्तर दिशेला धातू किंवा स्फटिकाचा कासव ठेवतात.

## सल्ला

जर प्रेशर कुकरचा रबर थोडा सैल झाला असेल तर पिठाचा गोळा बनवा आणि तो झाकणाभोवती ठेवा. नंतर झाकण बंद करा आणि दाब वाढेपर्यंत धरून ठेवा.

## सौंदर्य

लिंबाच्या रसात मध मिसळून मानेवर लावा. २० मिनिटांनंतर कोमट पाण्याने मान धुवा. हा उपाय आठवड्यातून दोनदा केल्याने मान स्वच्छ होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ११ मे २०२५

**श्रीनृसिंह जयंती, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, स्वाती अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील. कोणत्याही प्रकारचे जोखिम अंगलट येईल. विवाहेच्छूकांचे विवाह जमतील.

**वृषभ :** जर आपणास एका कार्यात वाढ मिळाली तर इतर कार्यात अवनती होणे शक्य आहे. दिवस काळच्या इतका सुखद जाणार नाही.

**मिथुन :** धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये स्थिती अनुकूल राहिल. सहकार्यांबरोबर प्रतिष्ठा वाढेल. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**कर्क :** वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. पत्नीपासून सुख मिळेल. जुन्या मित्रांचा सहवास लाभेल. स्पर्धात्मक खेळांमध्ये सहभाग घ्याल.

**सिंह :** गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल. खरेदी-विक्रीत लाभ मिळण्याची स्थिती बनेल.

**कन्या :** व्यवसायासाठी उत्तम वेळ. नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**तूळ :** आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. मनोबल व आत्मविश्वास वाढविणारी एखादी घटना घडेल.

**वृश्चिक :** सामाजिक क्षेत्रांमध्ये अजून काही विशेष कार्ये होईल. वैवाहिक सुख वाढेल.

**धनु :** एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल मात्र शत्रू प्रभावहीन पडतील. व्यवसायातील आर्थिक महत्त्वाची कामे मार्गी लावू शकाल.

**मकर :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**कुंभ :** आपला निष्काळजी दृष्टीकोण आज चांगला ठरणार नाही. व्यापारात मोठे नुकसान होईल.

**मीन :** घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन ठरतील. उधारी उसनवारी वसुल होईल. शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना दिवस चांगला जाईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१७४ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) दुसऱ्यावर अवलंबून असणे ७) एक मूल्यवान लाकूड व त्याचे झाड ८) जबरदस्ती १०) वाहनाचे पाय; चक्र ११) धोबी; परीट १२) एक त्वचारोग १४) परागंदा; पळून गेलेला १५) ज्याची शिकार करावयाची आहे तो प्राणी १६) केशवर्धक तेल देणारी एक वनस्पती १८) मोठी पुडी २०) सोने; सुवर्ण; कनक; कांचन २२) भरलेले; घट्ट २३) प्रमाण; गमक; पुरावा; प्रमाणपत्र

**उभे शब्द :-** १) एका हाताची ओंजळ २) क्रोध; त्वेष ३) रासभ; गर्दभ; गाढव; खर ४) शक्ती; ताकद; जोर ५) दृष्टी ६) दीन; रंक ९) अव्यवस्था; बेबंदशाही; अराजक १०) नोकरी करून उपजीविका करणारा वर्ग १२) चूक; हलगर्जीपणा; असावधानता १३) थोडे; अल्प; म्हातारपण १७) विधी; नियम; लॉ १९) डाव्या हाताने काम करणारा २१) झाडाचे पान २२) बरा; चांगला

### शब्दगंध क्र. ७१७३ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** तुम्ही बरोबर योग्य असाल तर काहीच सिद्ध करण्याचा प्रयत्न करू नका फक्त योग्य वेळेची वाट पहा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'मान्सून' कशाला म्हणतात?

'मान्सून' हा शब्द 'मौसम' या अरबी शब्दावरून अस्तित्वात आला आहे. मौसम म्हणजे ऋतू. आग्नेय आणि दक्षिण आशियाई देशांत, म्हणजे भारत आणि भारताच्या पूर्वेस असलेल्या देशांत पाऊस ठराविक ऋतूत पडतो. या देशांत उन्हाळ्याच्या अखेरच्या भागात समुद्राकडून जमिनीकडे वारे वाहतात. तर हिवाळ्यात जमिनीवरून समुद्राकडे वारे वाहतात. समुद्राकडून जमिनीकडे वाहणारे वारे या देशांत जून ते सप्टेंबर या काळात मोसमी पाऊस आणतात. हाच तो मान्सून. उन्हाळ्याच्या सुरुवातीला जमीन तापायला सुरवात होते.

जमीन पाण्यापेक्षा लवकर तापते नि थंड होते. सततच्या उन्हामुळे आशिया खंडातला हा भूभाग प्रचंड तापतो आणि इथे या भूभागावर कमी दाबाचा पट्टा निर्माण होतो.

साहजिकच समुद्राकडून जमिनीकडे वारे वाहू लागतात. हे नैर्ऋत्य मान्सून वारे. हिवाळ्यात जमीन थंड होत जाते तर पाणी उबदारच राहते. यामुळे जमिनीकडून सागराकडे वारे वाहतात. हिमालयाला अडलेले ढग या वाऱ्यांबरोबर परत फिरतात. याला ईशान्य मान्सून म्हणतात.

### असमाधान

थंडीच्या दिवसात, एक गाढवास असे वाटेल की, उघडी हवा आणि वाळलेला कडवा यांच्या ऐवजी थोडीशी उष्णता आणि घासभर ताजे गवत आपणास मिळेल तर फार चांगले होईल.

ही त्याची इच्छा लवकरच पूर्ण झाली परंतु त्याबरोबरच त्याचे कामही वाढले व त्यामुळे त्याला हिवाळ्याप्रमाणेच उन्हाळ्याचाही कंटाळा येऊ लागला. आता पावसाळा येईल तर चांगले, असे त्याला वाटू लागले.

लवकरच पावसाळा आला व पुढे येणाऱ्या हिवाळ्यासाठी लागणारे सामान वाहून नेण्याचे श्रम त्याला पडू लागले.

शेवटी, आता हिवाळा येईल तर चांगला असे त्याला वाटू लागले.

तात्पर्य : अतृप्त व्यक्तीचे समाधान क्वचितच होतो.

## रहमते दर्शन (भाग - १)



### उन्होंने अपनी रहमत से मुझे बुलाया

बारे में बताया और कहा, किसी से कुछ भी लोगे, तो वह तुम्हें वापिस देना पड़ेगा, हो सकता है यह कर्जा उतारने के लिए तुम्हें दूसरा जन्म भी लेना पड़े। इन वाक्यों को सुनते ही मैं बेचैन हो उठी क्योंकि मैं घर-घर जाकर सफ़ाई का काम करती हूँ और मुझे लोग कुछ न कुछ देते ही रहते हैं। मुझे लगा कि महाराज जी के कथनानुसार मुझे कर्जा उतारने के लिए वापिस जन्म लेना पड़ेगा। मैं थर्रा उठी और मैंने महाराज जी से मिलने का निश्चय कर लिया क्योंकि फिर कभी मिलने का मौका मिले या नहीं मिले।

सत्संग समाप्त होते ही मैं स्टेज की ओर बढ़ी ताकि महाराज जी से बात कर सकूँ। पास आकर मैंने प्रार्थना की, महाराज जी! मैं तो अछूत जाति की हूँ। मुझे घर-घर जाकर सफाई वगैरह करनी पड़ती है। लोग मुझे कुछ न कुछ देते रहते हैं। तो उनका कर्ज चुकाने के लिए क्या मुझे फिर जन्म लेना पड़ेगा?

मेरी समझ में कुछ नहीं आ रहा है, क्या करूँ? इतना सुनते ही महाराज जी ने मुझे प्यार भरा आशीर्वाद दिया और जैसे माँ बच्चे की अटपटी बात सुनकर उसे छाती से लगा लेती है, मुझे भी ऐसा ही अनुभव हुआ। महाराज जी ने अपनी पवित्र वाणी से मुझे समझाया और कहा, अरी बावरी,

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### अनाहत चक्र

चाहे कैसी भी परिस्थिति हो अगर हम मन में स्नेह का भाव रखें तो देर सवेर विजय हमारी ही होगी। प्रेम के संकल्पों में चुम्बकीय बल होता है। ये संकल्प अपने आस पास के वातावरण पर प्रभाव डालते हैं। सब व्यक्ति व प्रकृति के पदार्थ उसकी तरफ खींचे चले आते हैं। जब हम प्यार के संकल्प मन में रखते हैं तो उनसे विटामिन वा मिनरल आदि बनने लगते हैं जो खून में मिल जाते हैं और जहां उनकी जरूरत होती है उस अंग को शक्तिशाली बना देते हैं। जब हम प्रेम के संकल्प करते हैं तो यह संकल्प सूक्ष्म कीटाणु बन जाते हैं जो हर प्रकार के बुरे कीटाणुओं को खा जाते हैं। कैंसर आदि के रोगाणु भी खत्म हो जाते हैं।

प्रेम के संकल्प एक टानिक का काम भी करते हैं। ऐसे शक्तिशाली टानिक दुनिया के किसी भी पदार्थ से प्राप्त नहीं होते। प्रेम के संकल्पों से ऐसा बल पैदा होता है जिस से हमारे पाप कर्म भस्म हो जाते हैं और सूक्ष्म शरीर शुद्ध हो जाता है। प्रेम के संकल्पों से हमारे में दिव्य गुण अपने आप आने लगते हैं और हम सर्व गुण सम्पन्न १६ कला सम्पूर्ण बन जाते हैं। मन से आलस्य, अलबेलापन, बहानेबाजी के सूक्ष्म विकार खत्म हो जाते हैं। स्नेह के संकल्पों से ऐसा बल उत्पन्न होता है जिस से हम

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'आत्मसात...'

त्याने माती आणली. पाणी घेतलं. मातीत पाणी टाकून छानसा गोळा तयार केला. त्याला त्या गोळ्यातुन झाड तयार करायचं होतं. त्याने खुपच छान झाड घडवलं. खोडाला, पानांना, फांद्यांना रंग दिला. म्हणाला, 'ह्यापुढं खरं झाड लावायचं. मायेनं, खत-पाणी द्यायचं. झाड जगवायचं.'

'सुयशमार्ग' ह्या माझ्या प्रेरणादायी संवाद व्याख्यानात मी नेहमी सांगतो की व्यक्तीने नेहमी चांगलं ते आत्मसात करावं. माझे मित्र सुप्रसिध्द नाट्य, चित्रपट लेखक - अभिनेते योगेश सोमण म्हणतात माणसाने नेहमी टिपकागद व्हावं. चांगलं ते शोषुन घ्यावं. आत्मसात करण्याची अर्थात शोषुन घेण्याचा प्रयत्न केव्हा सुरु होतो? जेव्हा आपण, आपल्यासमोर घडणारी एखादी घटना पाहातो, एखादं नाटक, चित्रपट पाहातो, व्याख्यान ऐकतो, एखाद्या विजेत्या स्पर्धकाचं अथवा एखाद्या परिक्षकाचं मनोगत ऐकतो, एखाद्या कथा, कविता अथवा लेखातील वाक्य अथवा परिच्छेद आपल्याला मनापासून आवडतो, त्याची अंमलबजावणी करावीच असं अगदी शंभर टक्के मनापासून वाटतं. खरं तर आणखीही उदाहरणं आहेतच आत्मसात करण्याची. उदाहरणादाखल समजुन घेऊया.

इयत्ता दहावीच्या एका वर्गात पन्नास विद्यार्थी आहेत. जो विद्यार्थी सर अथवा मॅडम जे शिकवतात ते मनएकाग्र करुन ऐकतो. ऐकतांनाच तो आत्मसात करत असतो. ह्यासोबत शिक्षकांनी सांगितलेला गृहपाठ, शाळेतुन घरी आल्यावर लगेच पूर्ण करतो म्हणजेच तो गृहपाठाच्या वेळी अधिकचं आत्मसात करतो. सर्वात महत्वाचं म्हणजे आपण जे पाहिलं, ऐकलं, वाचलं त्यातलं किती आणि काय काय आत्मसात करायचं हे आपल्यावरचं अवलंबुन आहे. तुम्ही पाहिलं असेलच एका वर्गात साधारण पन्नास विद्यार्थी असतील. एका बेंचवर दोन विद्यार्थी बसतात. ते एकमेकांपासून कळत नकळतपणे काहीतरी आत्मसात करत असतात हे त्या दोघांच्या, शिक्षकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या लक्षात येतं. त्यावरुन त्या दोघांना एकमेकांशेजारी बसवायचं की नाही ठरतं. ह्याला एकमेव कारण म्हणजे त्यांनी एकमेकांमधलं नेमकं काय आत्मसात केलं. चांगलं आत्मसात करणं ही एक कला आहे.

'साहित्य सहवास' चे पाचशे लेख, लघुकथा झाल्या तेव्हा माझ्या एका मित्राने माझा सन्मान केला. मला हॉटेलमध्ये जेवायला नेलं. त्याच्यासोबत त्याचा मित्र, आम्ही तिघेही जेवलो. त्याच्या मित्राने मला विचारलं की 'साहित्य सहवास' चा हा एवढा मोठा साहित्य प्रवास कसा शक्य झाला? मी उत्तरलो, आपण तिघेही ह्या हॉटेलात आलो. जेवलो.

गप्पा मारतोय पण तुम्ही दोघांनी आजुबाजुला नेमकं काय - काय चाललंय, हे पाहिलंच नाही. मी ते पाहातोय. चांगलं ते आत्मसात करतोय कारण हेच चांगलं अनेकांना द्यायचं आहे. लिखानासाठी वाचन, मनन, चिंतन आवश्यक आहे तेवढंच आत्मसात करणंही महत्वाचंच आहे. आम्ही साहित्यिक मंडळी वेगळं काही करत नाही. समाजात गेलो की प्रत्येक विचार, व्यक्ती, कृतींचं निरिक्षण करतो. त्यातलं चांगलं ते आत्मसात करतो. प्रतिभा शक्तीचा योग्य उपयोग करुन त्यावर योग्य तो साहित्य संस्कार करुन लेख, कविता, कथा, एकांकिका, नाटक, चित्रपट ह्या माध्यमातुन तुमच्यापर्यंत पोहोचवतो. तुम्ही लेख, कथा, कविता वाचता, एकांकिका, नाटक, चित्रपट, पथनाट्य, दूरदर्शनवरिल मालिका पाहाता तेव्हा त्यातलं काय आत्मसात करता? ह्या प्रश्नाचं उत्तर फक्त तुम्हालाच माहित आहे.

एक मात्र शंभर टक्के खरं आहे की आपल्या दैनंदिन जीवनात आपल्यासमोर अनेक घटना - कृती घडतात, अनेक विचार ऐकायला मिळतात, अनेक व्यक्ती पाहायला मिळतात. त्या घटना-कृती, विचार, व्यक्ती मधलं चांगलं तेच आत्मसात केलं पाहिजे. कारण आपण जे आत्मसात करणार आहोत ह्यावरच आपला भविष्यकाळ नेमका कसा असणार आहे हे अवलंबून आहे.

आत्मसात करण्यासाठी भवतालचं निरिक्षण, पुस्तकांचं वाचन, मनापासून ऐकण्याची शिवाय सम रेच्याचं संपूर्ण बाजु ऐकण्याची, अनुभवांचं आदान-प्रदान करण्याची नितांत आवश्यकता आहे. एखादी चांगली गोष्ट मी तुम्हाला वारंवार तळमळीने सांगतोय पण तुमच्यावर त्या चांगल्या गोष्टीचा काहीच परिणाम होत नसेल तर माझं फारसं नुकसान होणार नाही पण तुमचं होणारं नुकसान पश्चाताप करायला लावणार असेल. चला, आतापासूनच चांगलं ते आत्मसात करूया. कारण सुसंधी कधीकधी एकदाच मिळते. चांगलं आत्मसात केलं नाही तर त्या संधीचं सोनं करता येणार नाही. वेळ आपल्याला काहीतरी सांगण्याचा, शिकवण्याचा प्रत्येक क्षणी प्रयत्न करते. ते सांगणं, शिकवणं आत्मसात करण्याची सवय लावुया.

(लेख क्र.५४९)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगी : काय करतोयेस?

मुलगा : शेंगा खातोय?

मुलगी : एकटा एकटाच

मुलगा : दहा रुपयाच्या शेंगांमध्ये काय भंडारा घालू का मग?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* हरितसेना कशाशी संबंधित आहे?

- वनीकरण, पर्यावरण, शेती

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### पंचेंद्रियांचा विकास

**३) एक वर्ष ते तीन वर्षे :** या वयातील मुलांच्या पंचेंद्रियांचा विकास होऊन मेंदूला चालना मिळण्यासाठी वेगवेगळ्या आकारांची, रंगांची खेळणी बाळाला द्यावी. दीड ते दोन वर्षांची मुलगी बाहुली, प्राणी, पक्षी अशा खेळण्यांबरोबर जास्त खेळते; तर मुलगा मोटारगाडी, चेंडू, विमान या खेळण्यांबरोबर जास्त खेळतो. या वयातील बाळांना कार्टूनची चित्रे असणारी पुस्तके बघण्यास द्यावीत. या वयातील मुलांना वाचता येत नाही. परंतु पुस्तकातील चित्र बघून ते संदर्भ लावू शकतात व आपण बाळाचा मानसिक व बौद्धिक विकास चांगल्या प्रकारे करू शकतो. याबद्दलचे सखोल माहिती आपण बाळाची खेळणी या प्रकरणात आपण पाहिली आहे. बाळाचे आरोग्य सुदृढ व्हावे व त्याची शारीरिक व मानसिक वाढ चांगली व्हावी, म्हणून 'दुर्वांकुर बालप्राश' अर्धा-अर्धा चमचा सकाळ-संध्याकाळ द्यावा.

**४) तीन वर्षे ते सहा वर्षे -** या काळात आपण बाळाच्या मेंदूचा विकास जास्तीत जास्त होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, कारण एका शास्त्रज्ञाने म्हटले आहे, की बाळाच्या मेंदूचा विकास हा जास्तीत जास्त सहा वर्षांपर्यंत होत असतो. त्यामुळे या वयात जेवढे काही संस्कार केले जातील, त्याचा पुढील आयुष्यामध्ये चांगलाच उपयोग होतो.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००




# चयापचय क्रिया म्हणजे काय?



चयापचय क्रियेबाबत आजवर बरंच काही लिहिलं आणि बोललं गेलं आहे. मात्र ही क्रिया म्हणजे नेमकं काय, चयापचय क्रियेमुळे शरीराला कोणते लाभ होतात, याबाबत फारशी माहिती नसते. चयापचय क्रिया म्हणजे नेमकं काय हे जाणून घेण्याचा हा एक प्रयत्न...

चयापयच ही नैसर्गिक क्रिया आहे. या क्रियेबाबत आपण फार काही करू शकत नाही. वजनवाढ आणि चयापचय क्रिया यांचा संबंध जोडला जातो. मात्र या क्रियेचं कार्य एवढ्यापुरतं मर्यादित नाही. चयापयच क्रियेमुळे बरंच काही साधलं जातं. चयापचय क्रियेचं वर्णन करायचं तर आपल्या शरीरात होणारी रासायनिक प्रक्रिया म्हणजे चयापचय क्रिया असं म्हणावं लागेल. श्वास घेणं, स्नायूंची हालचाल, अन्नपचन, ऊर्जेची निर्मिती हे सगळ चयापचयामुळे शक्य होतं. आपल्या शरीराच्या विविध क्रियांसाठी ऊर्जेची गरज असते. त्यामुळे ही ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी लागणाऱ्या कॅलरी म्हणजे चयापचय असंही म्हणता येईल. काही लोकांच्या चयापचय क्रियेचा वेग अधिक असतो तर काहींचा कमी असतो. काहींच्या शरी- राला इतरांपेक्षा अधिक ऊर्जेची म्हणजे कॅलरींची गरज असते. त्यामुळे चयापचयाचा वेग वाढतो. यामुळे वजनवाढीवर नियंत्रण मिळवता येतं. भरपूर खाल्ल्यानंतरही काहींचं वजन वाढत नाही. वेगवान चयापचय क्रियेमुळे असं घडतं.

**जाणून घ्या**

आता चयापचय क्रियेचा वेग वाढवणं शक्य आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. चयापचय क्रियेचा वेग वाढवणं शक्य आहे. मात्र हा वेग काही अंशांपर्यंतच वाढवता येईल. स्ट्रेंथ ट्रेनिंगच्या माध्यमातून चयापयच क्रियेचा वेग वाढू शकतो. काही औषधांच्या सेवनामुळे चयापचय क्रियेचा वेग वाढू शकतो किंवा कमी होऊ शकतो. सकाळी पूर्णधान्याचं सेवन केल्यामुळे चयापचय क्रिया सुधारते. वजन कमी झाल्यामुळे चयापचय क्रियेचा वेग मंदावू शकतो. वय वाढल्यानंतर चयापचय क्रिया मंदावते. वय वाढल्यानंतर हालचालींवर मर्यादा येत असल्याने चयापचय क्रियेचा वेग कमी होतो.

# थायरॉइड नियंत्रणासाठी



अनेकांना हायपोथायरॉईडिझमचा त्रास असतो. भारतात दहा पैकी एका व्यक्तीला या विकाराने ग्रासलं आहे. निरोगी जगण्यासाठी थायरॉईड नियंत्रणात असणं गरजेचं असतं. हार्मोन्सचं असंतुलन हे थायरॉईडचं मूळ कारण आहे. आहारातल्या काही बदलांमुळे थायरॉईड नियंत्रणात ठेवता येतो.

**आरोग्य व्यवस्थापन**

* अॅव्होकॅडो हे विविध पोषक घटकांनी समृद्ध फळ आहे. यात पोटॅशियम तसंच इतर काही पोषक घटक असतात. यामुळे रक्तातल्या साखरेची पातळी नियंत्रणात रहायला मदत होते. तसंच हार्मोन्सचं संतुलन साधलं जातं. यामुळे थायरॉईड ग्रंथीचं काम सुरळीत सुरू रहायला मदत होते.

* हिरव्या पालेभाज्यांमधल्या पोषक घटकांमुळेही हार्मोन्सचं संतुलन साधलं जातं. त्यामुळे आहारात अशा भाज्यांचा समावेश करायला हवा.

* विविध प्रकारच्या माशांमध्ये ओमेगा ३ फॅटी अॅसिड्स असतात. या पोषक घटकामुळे शरीराचा दाह कमी होतो. रोगप्रतिकारकशक्ती वाढते तसंच हृदयविकाराचा धोका अनेक पटींनी कमी होतो.

* थायरॉईड ग्रंथींचं कार्य सुरळीत सुरू रहाण्यासाठी आयोडिन आणि सेलेनियम या घटकांची गरज असते. हे दोन्ही घटक अंड्यातून मिळू शकतात. यासोबतच प्रथिनं आणि टायरोसिन हे घटकही अंड्यातून मिळतात. त्यामुळे अंड्यांचा आहारात समावेश करायला हवा.

# हर्निया शस्त्रक्रिया आता अधिक सुरक्षित

हर्नियामध्ये आपल्या शरीरातील नैसर्गिक किंवा अनैसर्गिक छिद्रांतून एखादा अवयव, इंद्रिय किंवा त्या अवयवाचा भाग बाहेर येतो. शस्त्रक्रिया ही हर्नियाच्या सर्वात महत्वाच्या उपचारांपैकी एक आहे. शस्त्रक्रियेतील प्रगतीमुळे आधुनिक हर्निया शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित बनली असून त्यातून रुग्ण लवकर बरा होतो, शिवाय शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या



गुंतागुंतीचं प्रमाणही कमी झालं आहे. तीव्रता आणि परिणामानुसार हर्नियाचे अनेक प्रकारांमध्ये वर्गीकरण केलं जातं. पोटाच्या खालच्या भागात हर्निया जास्त प्रमाणात आढळून येतो. जांघेत, मांडीच्या अगदी वरच्या भागात, बेंबीत, क्वचित फुप्फुस, मेंदू, स्नायू किंवा चरबी यांचा हर्निया होऊ शकतो.

हर्निया वाढत असेल किंवा त्यामुळे दुखत असल्यास त्यावरून त्याच्यावर करण्यात येणारे उपाय ठरवले जातात. हर्नियाची ओपन किंवा लेप्रोस्कोपिक सर्जरी करून तो बरा केला जातो. हर्निया मोठा होत असतो किंवा अस्वस्थता आणि वेदना होत असतात, तेव्हा लवकर शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला जातो.

**आरोग्यविशेष**

**डॉ. विजय क्षीरसागर**

आधुनिक शस्त्रक्रिया पद्धतींनी हर्निया उपचारांच्या परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. लेप्रोस्कोपिक शस्त्रक्रियेत एका छोट्या कॅमेऱ्याचा आणि छोट्या उपकरणांचा वापर केला जातो. लेप्रोस्कोपिक शस्त्रक्रियेत अगदी छोटे छेद दिल्यामुळे हर्नियाच्या आसपासच्या उतींना कमीत कमी हानी पोचते.

नेहमीच्या शस्त्रक्रियेमध्ये (ओपन शस्त्रक्रियेत) मोठे छेद देऊन स्नायू कापून परत शिवले जातात; साहजिकच हर्निया परत होण्याची शक्यता अधिक असते. रोबोटिक हर्निया शस्त्रक्रिया केल्यास ती शक्यता कमी होते. कोणत्याही शस्त्रक्रियेनंतर भविष्यात आतडी एकमेकांना अथवा पोटाच्या स्नायूंना चिकटू शकतात; मात्र रोबोटिक हर्निया शस्त्रक्रिया केल्यास हे प्रमाण खूप कमी होतं. यामुळे दैनंदिन कामांना लवकर सुरुवात करता येते.

काही वेळा 'एक्सटेंडेड टोटली एक्स्ट्रापेरिटोनियल' ही शस्त्रक्रिया पद्धत हर्नियाच्या उपचारांसाठी वापरली जाते. यात पेरिटोनियमच्या बाहेरून, म्हणजे पोटातल्या अवयवांना स्पर्श न करता, दुरुस्ती केली जाते. या तंत्राचा वापर इनग्युनल, वेंट्रल किंवा लंबर हर्नियाच्या उपचारांसाठी केला जाऊ शकतो. याचे फायदे म्हणजे आतड्यांसंबंधी दुखापत होण्याचा धोका कमी होतो. ज्या व्यक्तींनी पूर्वी पोटाची शस्त्रक्रिया केली आहे, त्यांच्यासाठी ही योग्य उपचार पद्धती आहे.

ट्रान्सव्हर्सस अॅबडोमिनिस रिलीज ही मोठ्या, गंभीर किंवा वारंवार होणाऱ्या व्हेंट्रल हर्नियासाठी एक अत्याधुनिक व प्रभावी प्रक्रिया ठरते. यात स्नायूंना जास्त ताण न देता प्रभावी उपचार केले जातात. ही थेरपी पोटाच्या भिंतीवरील दबाव कमी करते आणि त्यामुळे पुनरावृत्तीचा धोका कमी होतो. पोटाच्या भिंतीच्या पुनर्बांधणीचा एक भाग म्हणून मोठ्या हर्नियाच्या दोषांच्या बाबतीत हे केलं जातं. गुंतागुंत होण्याचा धोका कमी करण्यासाठी आणि हर्निया दुरुस्त करण्यासाठी इथे स्नायूंच्या थरांमध्ये जाळी ठेवली जाते. वयोवृध्दांना स्थानिक भूल देऊन शस्त्रक्रिया केली जाते. काही मोठ्या किंवा गुंतागुंतीच्या हर्नियासाठी ओपन सर्जरी योग्य ठरते आहे.

हर्निया शस्त्रक्रियेनंतर जलद रिकव्हरीसाठी शस्त्रक्रियेनंतर योग्य काळजी घेणे गरजेचे आहे.

* वेदना कमी करण्यासाठी डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांचा वापर करणं.

* शस्त्रक्रियेची जागा स्वच्छ ठेवणं आणि जखमेची काळजी घेण्यासाठी तज्ज्ञांच्या सूचनांचं पालन करणं गरजेचं असतं.

* किमान तीन महिने शारीरिकदृष्ट्या कठीण क्रिया टाळणं.

* गुंतागुंत टाळण्यासाठी हलका व्यायाम करणं.

* हर्नियाची लक्षणे दिसून आल्यावर पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी त्वरित वैद्यकीय मदत घेणं गरजेचं आहे.

# वारंवार तहान लागतेय?

तहान लागणं ही एक सामान्य प्रक्रिया आहे. उन्हाळ्यात तुम्हाला पुन्हा पुन्हा काहीतरी प्यावंसं वाटू शकतं; पण दिवसभर पुन्हा पुन्हा तहान लागली, पाणी प्यायल्यानंतर काही वेळातच घसा पुन्हा कोरडा झाला तर त्याकडे दुर्लक्ष करणं धोकादायक ठरू शकतं. काहीवेळा ही एक सामान्य गोष्ट आहे; परंतु ती सवय झाली तर हे काही आजारांचं प्रारंभिक लक्षणदेखील असू शकतं. वारंवार तहान लागण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे मधुमेह. शरीरातील साखरेची पातळी जास्त असते, तेव्हा किडनी ते फिल्टर करण्यासाठी जास्त लघवी तयार करते. त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता भासते आणि वारंवार तहान लागते. उष्णतेमुळे, जास्त घाम येणं, उलट्या किंवा जुलाबामुळे शरीरात पाणी कमी होण्याचा त्रास होऊ शकतो. या स्थितीला निर्जलीकरण (डिहायड्रेशन) म्हणतात. त्यामुळे तोंडाला कोरड पडते आणि वारंवार तहान लागते. याकडे दुर्लक्ष केल्यास इतर अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.



**आरोग्यचर्चा**

**डॉ. दत्तात्रय मुळे**

जास्त मीठ किंवा फास्ट फूड खाल्लं, तर वारंवार तहान लागते. मीठ संतुलित करण्यासाठी शरीराला पाण्याची जास्त गरज असते. मीठामुळे शरीरातली सोडियमची पातळी वढते आणि पुन्हा पुन्हा तहान लागते. ताप किंवा संसर्ग होतो तेव्हा शरीर गरम होते आणि जास्त पाण्याची गरज भासते. विशेषत: विषाणूजन्य ताप किंवा लघवी संसर्गामध्ये तहान वाढू शकते. निद्रानाश किंवा तणाव झोपेची कमतरता आणि मानसिक ताण शरीरातील द्रव संतुलनावर परिणाम करू शकतो. त्यामुळे पुन्हा पुन्हा पाणी पिण्याची इच्छा होऊ शकते. मधुमेह इन्सिपिडस ही एक वेगळ्या प्रकारची व्याधी आहे. यात शरीर पाणी टिकवून ठेवू शकत नाही. त्यामुळे वारंवार लघवी होणं आणि जास्त तहान लागणं, ही लक्षणं आढळून येतात. हा प्रकार गंभीर वाटत असेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# विषारी धातू ठरताहेत धोकादायक



जगभरात अनेक ठिकाणी माती आर्सेनिक, कॅडमियम, कोबाल्ट, क्रोमियम, कॉपर, निकेल आणि शिसे अशा विषारी धातूंनी प्रदूषित झालेली आहे. ही माहिती 'सायन्स' या मासिकातील एका अहवालात देण्यात आली आहे.

डेयी हो आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या संदर्भात संशोधन केल. त्यांनी १,४९३ प्रदेशांतील मातीच्या जवळपास आठ लाख नमुन्यांचे विश्लेषण केले. या अभ्यासानुसार, जगातील सुमारे १४ ते १७ टक्के शेतीयोग्य जमीनीत किमान एका विषारी धातूची पातळी सुरक्षिततेच्या मर्यादेपेक्षा अधिक असल्याचं आहे.

* जमिनीतील या प्रदूषणामुळे अन्नसुरक्षा, परिसंस्था आणि सार्वजनिक आरोग्य धोक्यात येतात. पीक उत्पादनात घट येते आणि अन्न साखळीत विषारी धातूंचा समावेश होतो. त्यामुळे किडनीचे विकार, कर्करोग, मज्जासंस्थेशी संबंधित समस्या आणि शारीरिक वाढीमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात.

**जीवनशैली**

**डॉ. महेश दाळे**

* या धातूंनी समृद्ध पट्टा युरेशिया भागात आढळतो. हा धोकादायक भाग नैसर्गिक घटक (धातूंनी समृद्ध खडक, ज्वालामुखी क्रिया) आणि मानवी हस्तक्षेप (खनिज उत्खनन, औद्योगिकीकरण, सिंचन) यांचा एकत्रित परिणाम आहे. * हवामान आणि भूप्रदेश यांचाही धातूंच्या साठ्यांवर प्रभाव असतो. * याला आळा बसावा म्हणून अभ्यासकांनी कडक पर्यावरणीय नियमावली, सुधारित मृदा परीक्षण, शाश्वत शेती पद्धती आणि जनजागृती मोहिमेची मागणी केली आहे.

# तरुणांमध्ये वाढतात यकृताचे आजार

२३ ते ३५ वयोगटातील, विशेषतः टाइप २ मधुमेहग्रस्त तरुणांमध्ये हिपॅटायटीस, फॅटी लिव्हर आणि सिरॉसिससारखे यकृताचे आजार वाढत आहेत. तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार मधुमेहींमध्ये यकृताशी संबंधित गुंतागुंतीची वाढती संख्या हे चिंतेचे कारण ठरत आहे आणि त्यासाठी वेळीच उपचार करणं आवश्यक आहे. तरुणांमध्ये 'नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज' आणि लिव्हर सिरॉसिसच्या प्रकरणांमध्ये वाढ होत आहे.

मधुमेहामुळे यकृताला जखमा (फायब्रोसिस) होतात. त्याचं योग्य व्यवस्थापन केलं नाही, तर सिरॉसिसची समस्या होते. म्हणूनच, यकृताचं दीर्घकालीन नुकसान टाळण्यासाठी आणि जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी वेळीच तपासणी, जीवनशैलीत बदल आणि मधुमेहाचं नियंत्रण करणं आवश्यक आहे. लठ्ठपणा, मधुमेह, फॅटी लिव्हर आणि उच्च कोलेस्ट्रॉलने पीडित रुग्णांचं प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.



'मेटॅबॉलिक डिसफंक्शन-असोसिएटेड लिव्हर डिसीज'मुळे यकृताचे अधिक गंभीर विकार (सिरोसिस, यकृतास होणारी जखम) होऊ शकतात आणि वेळीच उपचार न केल्यास ते यकृताच्या कर्करोगास कारणीभूत ठरू शकतात. सुरुवातीच्या टप्प्यात हे आजार रोखता येतात आणि बरेदेखील होतात. तरुणांमध्ये यकृताच्या विकारांत वाढ होण्याची बैठी जीवनशैली, शारीरिक हालचालींचा अभाव, पुरेशी झोप न घेणं, खाण्याच्या सवयी (अल्ट्रा-प्रोसेस्ड फुड, आहारातील कार्बोहायड्रेट्सचं वाढतं प्रमाण) आणि व्यसन ही महत्त्वाची कारणं आहेत.

मधुमेह स्वादुपिंडाबरोबरच यकृतावरही परिणाम करतो. रक्तातील ग्लुकोजची उच्च पातळी, आहाराच्या चुकीच्या सवयी आणि बराच वेळ एकाच ठिकाणी बसून राहिल्याने यकृत आणि स्वादुपिंडात चरबी जमा होते. त्यामुळे यकृताची जळजळ होण्याची आणि व्रण उमटण्याची शक्यता वाढते. कालांतराने, यामुळे सिरॉसिस होतो. लिव्हर सिरॉसिस झाल्यावर यकृत बरं होऊ शकत नाही. २३ ते ३५ वयोगटातील ३० टक्के तरुण मधुमेहाशी झुंजत आहेत. आधीच मधुमेह असलेल्या तरुणांमध्ये आणि यकृताच्या समस्यांमध्ये सुमारे १५ टक्के वाढ झाली आहे.

**जीवनशैली**

यकृताच्या व्याधी टाळण्यासाठी आहारात फायबरयुक्त पदार्थांचा समावेश तसंच साखर आणि चरबीचं प्रमाण कमी राखणं गरजेचं आहे. फळं आणि भाज्या, तृणधान्य आणि ऑलिव्ह ऑइलचा वापर केल्यास यकृताचं आरोग्य चांगलं राहतं. कंबरेचा घेर अधिक असेल तर जीवनशैलीतील बदलांसह (शारीरिक हालचाल, व्यायाम) निरोगी आहाराच्या सवयींचा अवलंब करणं आणि वजन पाच ते दहा टक्क्यांनी कमी केल्यास फॅटी लिव्हरच्या प्रमाणात घट होऊ शकते. योग्य आहारामुळे भविष्यात यकृताचा विकार होण्याचा धोका सुमारे ५० टक्क्यांनी कमी होऊ शकतो.

# प्रौढ वयात मूत्रमार्गाच्या संसर्गात वाढ

सध्या तापमानाचा पारा वाढत आहे. उन्हाळा तीव्र होत जातो, तशा आरोग्याच्या समस्या तोंड वर काढू लागतात. या काळात ३५ ते ५० वयोगटातील प्रौढांमध्ये मूत्रमार्गाच्या संसर्गात (यूटीआय) वाढ होण्याचं प्रमाण वाढतं. अति उष्णता, निर्जलीकरण आणि तापमानात होणारे चढउतार हे घटक या संसर्गात वाढ होण्यास कारणीभूत ठरतात. वेळीच निदान आणि उपचार केल्यास 'यूटीआय'चं व्यवस्थापन करण्यास मदत होऊ शकते.

मूत्रमार्गाचा संसर्ग हा मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशयासह मूत्रमार्गाच्या कोणत्याही भागात आढळू शकतो. लघवी करताना जळजळ होणं, फेस किंवा दुर्गंधीयुक्त लघवी होणं, वारंवार लघवी करण्याची इच्छा होणं, लघवीवाटे रक्त जाणं, ताप येणं आणि ओटीपोटात वेदना होणं ही याची लक्षणे आहेत. 'यूटीआय'वर वेळेत उपचार न केल्यास पायलोनेफ्रायटिस (किडनी संसर्ग) किंवा सेप्सिससारखी गंभीर गुंतागुंत निर्माण होऊ शकते. उन्हाळ्यात हा त्रास टाळायचा असेल, तर शरीर हायड्रेटेड राखणं, स्वच्छतेच्या सवयींचं पालन करणं, सुती अंतर्वस्त्रांचा वापर करणं आणि जास्त काळ लघवी रोखून न धरणं या गोष्टी कटाक्षाने पाळायला हव्यात.

उन्हाळ्यात डिहायड्रेशन होतं. त्यामुळे मूत्रमार्गाच्या संसर्गाचा धोका वाढतो. शरीरात पुरेसे द्रवपदार्थ नसतात, तेव्हा मूत्राशयातून विषारी पदार्थ आणि जीवाणू बाहेर काढता येत नाहीत. त्यामुळे संसर्ग होतो. उष्ण आणि दमट हवामान जीवाणूंच्या वाढीसाठी आदर्श वातावरण असतं. जास्त घाम येणं देखील जीवाणूंच्या वाढीस चालना देतं. 'यूटीआय'ला कारणीभूत ठरणारा सर्वात सामान्य जीवाणू म्हणजे एस्चेरिचिया कोलाई (ई. कोलाई). हा जीवाणू आतड्यांमध्ये आढळतो; परंतु तो मूत्रमार्गात गेला तर संसर्गास कारणीभूत ठरू शकतो. महिलांच्या मूत्रमार्गाची लांबी कमी असते, त्यामुळे जीवाणू मूत्राशयापर्यंत सहज पोहोचतात. म्हणून महिलांमध्ये 'यूटीआय' संसर्गाची शक्यता अधिक असते.



**जीवनशैली**

**डॉ. कुंदन गायकवाड**

प्रौढांमध्ये 'यूटीआय' संसर्गाचं प्रमाण ३० टक्क्यांनी वाढलं आहे. या रुग्णांच्या निदानासाठी मूत्र आणि रक्त तपासणीचा सल्ला दिला जातो. 'यूटीआय' टाळण्यासाठी, हायड्रेटेड राहणं, वेळोवेळी मूत्राशय रिकामं करणं, लघवी रोखून न ठेवणं, मूत्राशयावर परिणाम करणारे कॅफिन आणि अल्कोहोलचं सेवन कमी करणं आणि नाजूक भागाची चांगली स्वच्छता राखणं गरजेचं आहे.

**नवसंशोधन**

## मेंदू असतो लहान

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉरमेशन अँड टेक्नॉलॉजी हैद्राबादच्या शास्त्रज्ञांनी भारतीयांच्या मेंदूचा नकाशा तयार केला आहे. हा अशाप्रकारचा पहिलावहिला नकाशा आहे. भारतीयांचा मेंदूचा आकार इतरांच्या तुलनेत लहान असल्याची बाब या संशोधनातून समोर आली आहे. पाश्चिमात्य देश तसंच पूर्वेकडच्या इतर देशांमधल्या लोकांच्या तुलनेत भारतीयांच्या मेंदूचा आकार बराच लहान असतो. या संशोधनामुळे अल्झायमर तसंच मेंदूशी संबंधित इतर विकारांवरील उपचारांना गती मिळू शकते.



**दंतारोग्य**

## दात पांढरेशुभ्र होतात का?

दातांचा पांढरेपणा टिकवून ठेवण्यासाठी विविध प्रक्रिया केल्या जातात. दातांचा पिवळेपणा दूर करणाऱ्या प्रक्रियेबाबत बरेच गैरसमज आहेत. या प्रक्रियेनंतर दात पांढरेशुभ्र होतात, असा समज असतो. मात्र या प्रक्रियेचे लाभ व्यक्तीगणिक बदलत जातात. दागांचे प्रकार, दातांवरच्या एनामेलचा थर, दातांची क्षमता यावर बरंच काही अवलंबून असतं. त्यामुळे दात पूर्ण पांढरे होतीलच असं नाही.



**डोळ्यांचे आरोग्य**

## डोळे दुखत असतील तर...

लॅपटॉप आणि कॉम्प्युटरचा वापर केल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. डोळे दुखू लागतात. मात्र काही उपायांनी आपण हा ताण कमी करू शकतो. सतत स्क्रीनपुढे राहिल्याने डोळे दुखू लागले तर डोळ्यांवर थंड पाण्याचे हबके मारावेत. योगामुळेही आराम मिळू शकतो. आहारात डाळी, हिरव्या भाज्या, गाजर यांचा समावेश असावा.



**आजीबाईचा बटवा**

## शिळी पोळीही आहे गुणकारी

शिळ्या किंवा उरलेल्या पोळ्यांची फोडणीची पोळी केली जाते. मात्र बऱ्याच घरांमध्ये अशा उरलेल्या पोळ्या टाकून दिल्या जातात. अर्थात या शिळ्या पोळ्या अधिक लाभदायी ठरतात. या शिळ्या पोळ्यांमध्ये विविध आजार बरे करण्याची क्षमता असते.



या पोळ्यांमध्ये ताज्या पोळ्यांच्या तुलनेत प्रथिनांचं प्रमाणही अधिक असतं. शिळ्या पोळ्यांमुळे रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात रहाते. मधुमेहींना सकाळच्या वेळी दुधासोबत शिळी पोळी खाता येईल. शिळ्या पोळीच्या सेवनामुळे रक्तदाबही नियंत्रणात रहातो. त्यामुळे शिळी पोळी टाकून देऊ नये.

# बांधकाम परवानगी Auto DCR सोपी संगणकीय प्रणाली

**अ) ऑटो डी सी आर** (AutoDCR) **प्रणाली :-**

केंद्र शासनाच्या व्यवसाय सुलभला उपक्रमांतर्गत महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून माननीय मुख्यमंत्री व शासनाने यास सहमती दर्शवली आहे. सदर प्रणाली हि महाराष्ट्रामधील नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिकामध्ये विविध बांधकाम परवानगी प्रक्रियेचे प्रमाणीकरण करावयाच्या दृष्टीकोनातून पोर्टल / संगणकीय प्रणाली तयार करून ऑटो डी सी आर (AutoDCR) राबविण्याचा निर्णय नगरविकास विभागाने घेतला आहे. नगर विकास विभाग यांनी दिनांक १७/०८/२०२२ रोजी काढलेल्या शासन निर्णय टी. पी. एस / १८१५/५२७/प्र.क्र.१३९/१५/नवि-१३ अन्वये सॉफ्टटेक कंपनीद्वारे ऑटो डी सी आर (AutoDCR) ही प्रणाली उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर प्रणाली हि BPMS साठी अतिरिक्त पर्याय अर्जदार / विकासकांना उपलब्ध करून दिलेला आहे. सदर प्रणाली मुळे संगणकीय सेवेमध्ये सुधारणा व विश्वासर्हता मिळेल. सदर प्रणाली मधून खालील प्रकारचे प्रस्ताव दाखल केले जाऊ शकतात.

१) बांधकाम परवानगी
२) सुधारित बांधकाम परवानगी
३) प्लिंथ इंटिमेशन
४) भोगवटा प्रस्ताव तसेच विकास परवानगी ले - आऊट मंजूरी, प्लॉट एकत्रीकरण, प्लॉटची उपविभागणी इ. प्रकारची सर्व प्रकरणे संगणकीय प्रणाली मधून दाखल करून घेतली जातात.

संगणकीय प्रणालीमध्ये सामाविष्ट होणारे घटक.

१) वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) बिल्डर
२) जागा मालक,
३) सॉफ्टवेअर
४) मंजुरी देणारा तांत्रिक कर्मचारी वर्ग




**१) वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्नीकल पर्सन (सुपरवायजर) License Technical Person (LTP) :**

सर्वात प्रथम संगणकीय प्रणालीद्वारे प्रस्ताव दाखल करण्यासाठी वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्नीकल पर्सन (सुपरवायजर) यांना संगणकीय प्रणालीमध्ये स्वतःचे रजिस्ट्रेशन (परवाना) घेणे आवश्यक आहे. सदर प्रणाली मध्ये रजिस्ट्रेशन करण्यासाठी रजिस्टर नावाच्या लिंक मधून License Technical Person (LTP) हा पर्याय निवडावा. त्या नंतर New User Registartion Form समोर दिसेल. यामध्ये दिलेली सर्व माहिती काळजीपूर्वक भरून घ्यावी. पात्रता नुसार रजिस्ट्रेशन करता येते. सदर प्रणालीमधून आर्किटेक्ट, इंजिनिअर, स्ट्रक्टरल इंजिनिअर, सुपरवायर - १, सुपरवायर-२ इ. प्रकारची नोंदणी करता येऊ शकते. टेक्निकल प्रकारच्या रजिस्ट्रेशनसाठी दोन प्रकारचे पर्याय उपलब्ध आहेत.




LTP चे रजिस्ट्रेशन समजा Offline अथवा BPMS प्रणालीमध्ये पूर्वी झालेले असेल तर AutoDCR मध्ये वेगळी नोंदणी करण्याची आवश्यकता पडत नाही. Technical Person ला फक्त पूर्वीचा नोंदणी / परवाना क्रमांक, परवाना मुदत, जुनी परवाना मंजुरी पावती, तसेच सोबत स्वताःचा फोटो, शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र, Self Declairation, ई कागदपत्रे लागतात. हि सर्व कागदपत्रे upload केल्यास AutoDCR ID Activate होतो.

**जागा मालक/बिल्डर (Developer) :**

प्लॉटधारक अथवा बिल्डर यांना परवानगी घेण्यासाठी स्वतःच्या नावाचे रजिस्ट्रेशन संगणकीय प्रणालीद्वारे करावे लागते. यात रजिस्ट्रेशन करण्यासाठी आधार कार्ड, मोबाईल नंबर आणि Email ID ची आवश्यकता असते. सदर रजिस्ट्रेशनसाठी तांत्रिक मंजूरीची आवश्यकता नाही. सदर ID मध्ये ID धारकाचे मंजूर नकाशा, त्याचे पत्र पाहता येऊ शकतात, तसेच मंजूर झालेल्या प्रकरणाचे शुल्क देखील भरता येऊ शकते. तसेच दाखल केलेल्या प्रकरणाची सदय स्थिती (status) पाहता येते.

AutoDCR प्रणालीमधून मालक यांचे Registration करण्यासाठी Register नावाच्या पर्याय निवडून त्यात Developer Registration नावाचा पर्याय निवडावा. त्यामध्ये दिलेली माहिती काळजीपूर्वक भरून Owner ला OTP सेंड करून जागा मालक यांचे Registration करून घ्यावे. सदर प्रणाली मध्ये OTP साठी server down ची अडचण येत नाही तसेच एकदा मालक यांचे Registration केल्यानंतर परत registration करण्याची गरज नसते.




**३) सॉफ्टवेअर :**

संगणकीय प्रणालीद्वारे विविध प्रकारची प्रकरणे दाखल करताना सॉप्टवेअर महत्वाचा घटक आहे. कोणतेही प्रकरण दाखल करण्याआधी सदर प्रकरणाचा नकाशा (Plan) परवानाधरक व्यक्तीकडूनच बनवून व दाखल करून घेण्यात यावा. सदर नकाशा हा शासनाच्या UDCPR प्रणालीप्रमाणेच बनवून संगणकीय प्रणालीद्वारे प्रकरण दाखल करण्यासाठी Software ची आवश्यकता आहे. संगणकीय प्रणालीद्वारे प्रकरण दाखल करण्यासाठी संकेतस्थळावर सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत. AutoDCR (सॉफ्टटेक) https://maha.autodcr.com/BPAMSClient/Default.aspx द्वारे निशुल्क उपलब्ध आहे. सदर सॉफ्टवेअर हे महाराष्ट्र शासनाच्या UDCPR नियमावलीनुसार बनविलेले अहित. त्यामुळे दाखल प्रकरणाची सर्व छाननी योग्य पद्धतीने झाल्यानंतरच प्रकरण ऑनलाइन दाखल करता येते. सॉफ्टवेअर कशा पद्धतीने work / operate करते यासाठीचे video साइटवर उपलब्ध करून दिलेले आहेत. तसेच दर बुधवारी सॉफ्टवेअर कशा पध्दतीने चालवायची (operate) करायची याचे सकाळी ११ वाजता training दिले जाते.

सदर प्रणाली UDCPR च्या नियमानुसार बनवलेली असून यामध्ये अत्यंत काटेकोर पद्धतीने छाननी केली जाते. सदर प्रणाली मध्ये अगदी दरवाजा, खिडकी यांची रुंदी यांना सुद्धा बिनचूक पद्धतीने दाखवावे लागते तसेच layout मध्ये सुद्धा प्लॉटच्या length and width चा ratio सुद्धा बिनचूक छाननी केला जातो.

सदर प्रणालीमधून कागदपत्रे upload करताना देखील multiple documents वास्तुविशारद (आर्किटेक्ट) स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) यांना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. म्हणजे समजा NA Order आणि Layout जर upload करायचा असेल तर वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) यांना हे दोन Documents merge करण्याची आवश्यकता पडत नाही. सदर Documents हे एकाच फोल्डरमध्ये upload करता येतात. म्हणजे upload साठी folder उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. या मध्ये एकापेक्षा जास्त कागदपत्रे upload करता येतात. तसेच तांत्रिक कर्मचारी यांनी प्रकरण reassign केल्यास चुकीचे Document वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) यांच्या ID मधून re upload करताना जुने delete करून new attached करता येते. तसेच Drawing आणि scrutiny सुद्धा सदर Technical Person यांनी जेवढ्या वेळेस दुरुस्त करून upload केल्या आहेत तेवढ्या सर्व files server ला CAD तसेच PDF स्वरुपात उपलब्ध होतात.

**१) तांत्रिक कर्मचारी वर्ग- (Approval User) :**

वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता ( इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) यांनी संगणकीय प्रणालीद्वारे बांधकाम प्रस्ताव दाखल केल्यानंतर सदर प्रकरण हे Areawise दाखल होतात. संगणकीय प्रणालीमध्ये हद्दीमधील गावाप्रमाणे Area तांत्रिक कर्मचारी यांना नेमून दिलेला आहे. त्यामुळे दाखल केलेले प्रकरणे ही Automatically Area नुसार Authority ID मध्ये जातात. दाखल झालेल्या प्रकरणाची module नुसार वर्गवारी

Approval User च्या ID मध्ये उपलब्ध केलेली असते. तांत्रिक कर्मचारी खालील प्रमाणे प्रकरणाची पडताळणी करतात.

1) Documents Verification
2) Site Visit Selection / Site Visit Entry
3) Post Payment Verification
4) Proposal Forward / Approval

दाखल केलेल्या प्रकरणाची योग्य ती छाननी केली जाते. त्यात सर्वात प्रथम वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) यांनी दाखल केलेल्या प्रस्तावाची कागदपत्रांची पडताळणी केली जाते. कागदपत्रांची काही अपूर्तता असेल तर सदर प्रस्ताव योग्य त्या कारणासह Technical Person च्या ID मध्ये पाठवला जातो. Technical Person ने कागदपत्रे तसेच नकाशाची पूर्तता केल्यानंतर सदर प्रकरण परत Approval User च्या ID मध्ये जाते. सर्व प्रकरण UDCPR प्रमाणे योग्य असल्यास ते व्हेरिफाय करून स्थळ पाहणीसाठी वेळ दिली जाते. स्थळ पाहणी करून त्या प्रकरणाचा Site Visit Entry Report भरुन RR प्रमाणे Post Payment Charges Add करून वरिष्ठ अधिकारी यांना मंजूरीसाठी पाठवले जाते.

वरिष्ठ अधिकारी सर्व प्रकरण तसेच तांत्रिक कर्मचारी यांचे सर्व Remark पाहून प्रकरण योग्य असल्याची खात्री करून मंजूर करतात. मंजूर प्रकरण हे वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) अथवा जागा मालक ज्यांचे Registration असेल त्यांच्या ID मध्ये Post Payment भरण्यासाठी दिसून जाते. Post Payment भरणा Online किंवा RTGS द्वारे भरला जाऊ शकतो. सदर भरणा करताना जर Premium रक्कम जर आली असेल तर हि रक्कम UDCPR Clause No. 2.2.14 नुसार निम्मी रक्कम हि शासनाला Gras system ने भरावी लागते. परंतू अश्या पद्धतीचा भरणा आला तर सर्व charges हे जागा मालक यांना RTGS/NEFT ने भरावे लागायचे. सदर प्रणाली मध्ये अश्या पद्धतीचा भरणा आल्यास जागा मालक विकासभार, उपकर, हि रक्कम online भरू शकतो आणि समजा भरणा रक्कम हि जास्त असेल आणि online भरता येत नसेल तर सदर system मधून RTGS या पर्यायामधून चलन काढून चेक़ किंवा बँकेमधून भरल्यास सदर भरणा भरलेली पावती system मध्ये upload करण्याची गरज पडत नाही. हा भरणा ३० मिनिटामध्ये ऑटो verify होतो आणि त्याची पावती लगेच मिळून जाते. भरणा भरल्यानंतर Technical Person यांना Owner Ekyc आणि स्वतःची डिजिटल साइन केल्यानंतर प्रकरण Appproval Authority कडे डिजिटल स्वाक्षरी साठी उपलब्ध उपलब्ध Appproval Authority यांनी डिजिटल स्वाक्षरी केल्यानंतर सदर प्रकरण हे वास्तुविशारद (आर्किटेक्ट), स्थापत्य अभियंता (इंजिनिअर), टेक्निकल पर्सन (सुपरवायजर) यांच्या ID मध्ये उपलब्ध होऊन जाते.

**क) संगणकीय प्रणाली फायदे**

१) संगणकीय प्रणालीद्वारे दाखल केलेल्या प्रस्तावाची User अथवा मालक यांना step by step माहिती उपलब्ध होते.

२) आपण दाखल केलेले कागदपत्र तसेच नकाशा हा पूर्णपणे डिजिटल स्वरूपात प्रणालीमध्ये सुरक्षित राहतो, त्यामुळे प्रस्ताव गहाळ होण्याचे प्रमाण अथवा तोटे नाहीत.

३) दाखल अथवा मंजूर प्रकरणाच्या प्रती या डिजिटल असल्यामुळे आपणास पाहिजे तेव्हा संकेतस्थळावरून घेता येतात.

४) तसेच दाखल आणि मंजूर प्रकरणाची भरलेली पावती संगणकीय प्रणालीमधून कधीही घेता येते.

५) सदर प्रणाली हि अत्यंत बिनचूक पद्धतीने बनवलेली आहे. यामध्ये जर layer overlap केले तरी system accept करत नाही.

६) सदर प्रणाली चा server हा बंद पडत नाही अथवा slow नसतो. तसेच रात्री सुद्धा shut down होत नाही.

७) RTGS केलेला भरणा system मध्ये upload करून verify करण्याची गरज पडत नाही. RTGS केलेला भरणा ३० min मध्ये auto verify होतो.

८) तसेच Technical Person यांनी upload केलेली file cad आणि pdf स्वरुपात संकेतस्थळावर उपलब्ध होते. तसेच जेवढ्या वेळेस reassign करून upload केलेली file असेल तेवढ्या files त्या त्या तारखेनुसार संकेतस्थळावर दिसतात.

९) सदर प्रणाली मध्ये upload केलेली file हि तांत्रिक कर्मचारी यांना एका पेक्षा जास्त वेळेस reassign करता येते.

१०) कागदपत्रे जोडताना merge करण्याची आवश्यकता पडत नाही. कागदपत्रे जोडताना folder उपलब्ध केलेले असल्यामुळे multiple documents upload करता येतात.

११) Service Data Entry pproval साठी तांत्रिक कर्मचारी यांची आवश्यकता पडत नाही.

१२) Drawing Tracing करताना कमी वेळ लागतो. म्हणजे एकपेक्षा जास्त रूम असतील तर प्रत्येक रूम separate मार्क करायची गरज पडत नाही सर्व रूम one click वर मार्क करता येतात.

१३) Approved झालेल्या प्रकरणाचे Post Payment जर चुकले असेल तर ते दुरुस्त करता येते.

१४) Moderate Risk Proposal सुद्धा सदर प्रणालीमधून मंजूर झालेले आहे.

१५) Ticket Raise system ही प्रणाली देखील उपलब्ध करून दिलेली असून feedback fast आहे.

१६) Website (AutoDCR)- https://maha.autodcr.com/BPAMSClient/Default.aspx



**इंजिनिअर :- गणेश अंबादास म्हस्के**
BE (Civil) (System Support Engineer)
Mobile No. 9834856286, 9730397597
Email ID-mhaskeganesha@gmail.com

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA

















पुणे येथील आनंद प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षपदी अहमदनगर मर्चंटस बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांची नुकतीच फेरनिवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

## सर्वांना सोबत घेऊन प्रतिष्ठानच्या सेवाभावी सामाजिक कार्याचा विस्तार करू

### हस्तीमल मुनोत यांचे प्रतिपादन; आनंद प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षपदी फेरनिवड झाल्याबद्दल मर्चंटस बँकेच्या वतीने सत्कार

नगर - पुणे येथील आनंद प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षपदी अहमदनगर मर्चंटस बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांची नुकतीच फेरनिवड झाली आहे. या निवडीबद्दल मर्चंटस बँकेच्या संचालक मंडळाच्यावतीने मुनोत यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संचालक मिनाताई मुनोत, संजय बोरा, अनिल पोखरणा, सी.ए., आयपी अजय मुथा, संजय चोपडा, सी.ए. मोहन बरमेचा, संजीव गांधी, किशोर मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, जॉइंट सीईओ नितीन भंडारी आदी उपस्थित होते.

हस्तीमल मुनोत म्हणाले, आनंद प्रतिष्ठानचे कार्य सर्वदूर पोहचले आहे. या संस्थेच्या उपाध्यक्षपदी झालेली फेर निवड आनंददायी आहे. सामाजिक क्षेत्रात काम करताना नेहमीच सर्वांना सोबत घेऊन आणि दूरदृष्टी ठेवून काम केले आहे. याच धर्तीवर आनंद प्रतिष्ठानचे कार्य अहिल्यानगर येथेही व्यापक करण्याचा प्रयत्न राहील. बँकेच्या सहकारी संचालकांनी केलेला सन्मान हा घरचा सन्मान आहे. त्यांनाही प्रतिष्ठानच्या कार्यात सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न असेल. व्हा. चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानले.

## सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारीपदी अहिल्यानगरच्या मोनिका झरेकरची निवड



नगर - महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग २०२३ मार्फत सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (वर्ग एक) पदासाठी घेतलेल्या परीक्षेतून खातगाव टाकळी (ता. नगर) येथील रहिवाशी मोनिका झरेकरची निवड झाली आहे. मंत्रालय कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, वजन-मापे निरीक्षक अधिकारी आणि कर व प्रशासकीय अधिकारी नगरपरिषद अशा चार पदांसाठी तिची यापूर्वी निवड झाली होती.

मोनिका झरेकरचे प्राथमिक शिक्षण ऑक्सिलियम कॉन्व्हेंट लोणावळा (जि.पुणे) येथे झाले. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातून मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विषयात पदवी घेतली. त्यानंतर काही काळ एका खासगी कंपनीत काम केले. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत प्रशासकीय सेवेत येण्याचा निर्धार करून परीक्षेच्या अभ्यासाला सुरूवात केली. जिद्द व चिकाटी असल्यामुळे आणि कुटुंबाची साथीमुळे उच्च पद प्राप्त केले.

तळेगाव दाभाडे (जि. पुणे) येथे कर व प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहे. या कालावधीत सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (वर्ग एक) पदासाठी दिलेल्या परीक्षेद्वारे निवड झाली आहे. मोनिकाचे वडील बाळासाहेब झरेकर हे नौदलातून नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त बबनराव झरेकर आणि नौदलातील सेवानिवृत्त अधिकारी रघुनाथ झरेकर यांची ती पुतणी आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश शिंदे यांची ती भाची आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

**काही लोकांचे आयुष्य पाहिले की 'जीवन त्यांना कळले हो' असे म्हणावे लागते. मात्र बहुतांश लोकांचे आयुष्य 'कसे जगायचे' हे समजून घेण्यातच जाते! वेळीच जगण्याची काही 'कौशल्ये' आत्मसात केली की जगणे नुसते सुसह्यच होत नाही, तर आनंददायीही होते. हेन्री नांगिया यांनी त्यांच्या 'लेसन्स लर्नड्? टू लेट इन लाईफ' या पुस्तकात जीवनात अशाच उशिरा कळणाऱ्या गोष्टींचा उल्लेख केला आहे जसे की, मौल्यवान वेळ वाया घालवू नका, पैसे कमावण्याइतकेच तुम्ही आरोग्याकडेही लक्ष द्या आदी. या पुस्तकात वैयक्तिक विकासावरही भर देण्यात आला आहे. अशाच काही महत्त्वाच्या गोष्टींची ही माहिती...**

## जगणे आनंददायी करण्यासाठी...

### रोग्य हीच खरी संपत्ती

आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. तुम्ही निरोगी राहाल तरच तुम्ही सर्व कामे व्यवस्थित करू शकाल. जेव्हा तुम्ही निरोगी असाल, तेव्हाच तुम्ही भरभरून जगू शकाल. गोष्टींचा आनंद घेऊ शकाल. अशा वेळीच तुम्ही चांगले खाऊ शकता, चांगले कपडे घालू शकता, कुठेतरी प्रवास करू शकता. पण जर तुमची तब्येत थोडीशीही बिघडली तर तुमच्या आवडत्या वस्तूही बेरंग दिसू लागतात. जेव्हा खूप उशीर झालेला असतो, तेव्हाच एखाद्या व्यक्तीला हे समजते.



### शिकणे कधीही थांबवू नका

आपला अभ्यास आणि काही छंद पूर्ण झाल्यावर आपण शिकणे बंद करतो. कदाचित जे काही शिकायचे होते ते शिकून झाले, असा विचार करत आता वय उलटून गेले आहे, असा विचार केला जातो. पण शिकण्याची मर्यादा नाही. तुम्हाला हवं ते, हवं तेव्हा तुम्ही शिकू शकता. गरज आहे ती आवड टिकवण्याची. आयुष्यभर शिकण्याची वृत्ती अंगीकारल्याने तुम्हाला एक उत्तम, शिक्षित आणि चांगली व्यक्ती बनण्यास मदत होऊ शकते.

### केवळ पैशासाठी काम नको

जीवन जगण्यासाठी पैसा खूप महत्त्वाचा आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा पैशाने मिळतात हे सर्वांनाच माहीत आहे. तथापि, पद धारण करण्यासाठी हे एकमेव प्रेरक असू नये हे महत्त्वाचे आहे. परंतु पैसा हे सर्व काही नाही. अशी नोकरी किंवा व्यवसाय करू नका, ज्यामध्ये तुमच्या प्रियजनांसाठी किंवा स्वतःसाठी वेळ नसेल.

### वर्तमानात जगा



तुमचे खरे जीवन तुमच्या जन्म आणि मृत्यूच्या क्षणांमध्ये नाही. तुमचे खरे आयुष्य आता आणि पुढच्या श्वासादरम्यान आहे. वर्तमान म्हणजे इथे आणि आता. म्हणून सध्याचा प्रत्येक क्षण पूर्णपणे शांततेने जगा. कोणतीही भीती किंवा पश्चात्ताप न करता. आणि या क्षणी तुमच्याकडे जे आहे ते सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न करा. काही लोक भूतकाळात आणि त्याच्याशी निगडित पश्चात्तापांमध्ये आयुष्य घालवतात. यामुळे त्यांचा वर्तमानच खराब होत नाही तर त्यांच्या भविष्यावरही तितकाच परिणाम होतो. भविष्यकाळाचीही अवाजवी चिंता करण्यात अर्थ नसतो.

### 'नाही' म्हणायला शिका

काही लोकांना आयुष्यात 'नाही' म्हणता येत नाही आणि ते सर्व काही मान झुकवून स्वीकारत असतात. अनेक वेळा जेथे 'नाही' म्हणणे आवश्यक असते, तेथेही ते 'हो' म्हणतात. पण हे पूर्णपणे चुकीचे आहे. 'नाही' म्हणायला शिकलो नाही तर या लोकांच्या दबावाला बळी पडत राहू. झाडे नेहमी सर्वात आधी तोडली जातात अशी एक म्हण आहे. इतका सरळपणाही चांगला नव्हे!

### अपयशातून शिका

या जगात अपयशाशिवाय यश मिळणे दुर्मीळ आहे. जेव्हा तुम्ही तुमच्या स्वप्नांचा पाठलाग करता, तेव्हा तुम्ही यशस्वी होण्याची तितकीच अयशस्वी होण्याची शक्यता असते. अनेकदा असं म्हटलं जातं की, अपयश माणसांना थांबवत नाही. पण लोक ज्या पद्धतीने अपयशाला सामोरे जातात, तेच त्यांना पुढे जाण्यापासून रोखते.

### निरुपयोगी गोष्टी

आपण काही गोष्टींवर अनावश्यक वेळ घालवतो. पैशाच्या मागे धावणे, लोकांवर रागावणे, वेळ वाया घालवणे, सतत कुणाशी ना कुणाशी भांडणे वगैरे. या सर्व गोष्टींना जीवनात काही अर्थ नाही. यामध्ये आपल्या शक्ती व वेळेचा निव्वळ अपव्ययच होतो. बाकी काही पदरी पडत नाही. पडलेच तर ते मन:स्तापाशिवाय दुसरे काही नसते. त्यामुळे फुटकळ गोष्टींना महत्त्व देणे, त्यावर वेळ घालवणे थांबवणे गरजचे असते.



## एक तास कमी झोपताय?

तन-मनाच्या विश्रांतीसाठी आणि आरोग्यासाठी सात-आठ तासांची गाढ झोप अत्यावश्यक असते. मात्र, सध्याच्या धावपळीच्या जीवनात अनेकांना पुरेशी झोप घेता येत नाही. अतिरिक्त कामामुळे किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळे आठवड्यात झोपेची वेळ विस्कटली की पुढचा पूर्ण दिवस बिघडल्यासारखाच होतो. त्यात वीकेंडला काही लोक आठवड्यातील झोप भरून काढण्यासाठी जास्त वेळ झोपतात. परंतु, अशा स्लीप रुटीनमुळे आपल्या शरीरावर याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, असे तज्ज्ञांनी म्हटले आहे.

युरोपियन सोसायटी ऑफ कार्डिओलॉजीच्या अलीकडील अभ्यासात असे सुचवले आहे की, वीकेंडच्या झोपेमुळे हृदयविकाराचा धोका २० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो. कामामुळे संपूर्ण आठवड्यामध्ये पुरेशी झोप न मिळणाऱ्यांसाठी हा शोध आशादायी आहे. दुसरीकडे तज्ज्ञांनी म्हटले आहे की, तुम्ही दररोज जरी फक्त एक तासाची झोप कमी घेतली, तरी



त्यातून बरे होण्यासाठी तुम्हाला चार दिवस लागू शकतात. या परस्परविरोधी दृष्टिकोनांमुळे, शनिवार व रविवारची झोप आठवड्यातील झोपेची कमी भरून काढू शकते की नाही, यावर अजूनही वादविवाद कायम आहे. अर्थात 'वीकेंड'ची निवांत झोप ही दीर्घकाळ झोपेच्या अनियमितपणामुळे उद्भवलेले काही नकारात्मक परिणाम कमी करण्यात मदत करू शकते; जसे की, हृदयविकाराचा धोका. अर्थात, यात अधिक संशोधनाची आवश्यकता आहे. वीकेंडला पुरेशी झोप घेतल्याने शरीरातील सी-रिॲक्टिव्ह प्रोटिनसारखे मार्कर कमी होऊन जळजळ कमी होऊ शकते, जे हृदयरोगाशी निगडित आहेत. तसेच ही 'कॅच अप स्लीप' रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते, ज्यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका कमी होतो. तसेच ते कॉर्टिसॉलसारख्या स्ट्रेस हॉर्मोन्स नॉर्मल करण्यास मदत करतात. याव्यतिरिक्त, स्लीप रिकव्हरी इन्सुलिन संवेदनशीलता आणि चयापचय कार्य सुधारू शकते, तसेच हृदयाच्या आरोग्यास प्रोत्साहन देते. पुरेशी झोप स्वायत्त मज्जासंस्थेतील संतुलन पुनर्संचयित करते, जे हॉर्ट रेट आणि ब्लड प्रेशर कंट्रोल करते.

## मंगळावर चक्क स्मायली फेस!

मंगळावरील खडक, टेकड्या यामधून अनेकांना अनेक भास होत असतात. मानवापासून ते विविध पशू-पक्ष्यांपर्यंतचे असे अनेक भास आतापर्यंत अनेकांना झालेले आहेत. आता स्मायली इमोजीसारखी एक आकृती मंगळभूमीवर दिसून आली आहे. या स्मायली फेसचा एक फोटो युरोपियन स्पेस एजन्सीने सोशल मीडियावर शेअर केला आहे.



युरोपियन स्पेस एजन्सी म्हणजेच इसाचे वैज्ञानिक नुकतेच मंगळावरील ही स्मायली पाहून थक्क झाले. हा विशालकाय स्मायली फेस त्यांनी इन्स्टाग्रामवर शेअर केला. इन्स्टावर इसाने खरे तर मंगळावरील मिठाचे भांडार दाखवणारी अनेक छायाचित्रे शेअर केलेली आहेत. हे ग्रहाच्या प्राचीन जीवन रूपांचे अवशेष असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या मिठाच्या साठ्यांमध्येच एक आकार असा स्मायलीसारखा होता. कुणीतरी मंगळावर हा स्मायली फेस तयार केलेला असावा, अशी त्याची सुंदर रचना होती. अर्थातच ती योगायोगाने व नैसर्गिकरित्याच बनलेली आहे. यापैकी काही मिठाचे साठे संभाव्य रूपाने मंगळावरील सरोवर व नद्यांमधून निघालेले व अद्याप तग धरून राहिलेले सूक्ष्मजीवही असू शकतात. अब्जावधी वर्षांपूर्वी मंगळावरील विपरीत वातावरणामुळे हे सूक्ष्म जीव निष्क्रिय बनलेले असू शकतात. स्मायली फेसचे हे छायाचित्र युरोपियन स्पेस एजन्सीच्या सॅटेलाईट एक्सोमार्स ट्रेस गॅस ऑर्बिटरने टिपले आहे. हे सॅटेलाईट मंगळावर जीवसृष्टीचे संकेत शोधत आहे. त्यानेच मंगळाच्या कोरड्या पृष्ठभागावर क्लोराईड मिठाच्या साठ्यांना कॅमेऱ्यात टिपून घेतले. हे मिठाचे साठे मंगळाचा भूतकाळ व भविष्यकाळ याबाबत सांगू शकतात, असे वैज्ञानिकांना वाटते. याबाबतच्या संशोधनाची माहिती सायंटिफिक डेटा जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आली आहे.

## गुरूपेक्षा मोठ्या बाह्यग्रहाचा शोध

आपल्या ग्रहमालिकेतील सर्वात मोठा ग्रह म्हणजे गुरू; मात्र त्याच्यापेक्षाही मोठ्या आकाराचे ग्रह अंतराळाच्या या अनंत पसाऱ्यात आहेत. खगोल वैज्ञानिकांनी मीन तारका समूहात गुरूपेक्षा दुप्पट वस्तुमानाचा ग्रह शोधून काढला आहे. या तारकाप्रणालीत एका ताऱ्याभोवती हा ग्रह फिरत आहे. आपल्या सौरमालेच्या शेजारी बहुतारकीय प्रणालींचे प्रमाण जास्त असताना ही एकतारकीय प्रणाली वेगळी ठरली आहे. एक तारकीय प्रणालीतील ताऱ्यांची निर्मिती ही बहुतारकीय प्रणालीपेक्षा वेगळ्या पद्धतीने होत असते, असे सॅन फान्सिस्को स्टेट युनिव्हर्सिटीचे खगोलशास्त्रज्ञ स्फीफन केन यांनी सांगितले.



बहुतारकीय प्रणालीत एकापेक्षा दोन ग्रहीय चकत्या असतात, त्यात ग्रहांचा जन्म होतो. एखादा जादाचा तारा हा विध्वंसक ठरू शकतो व त्याचे गुरुत्व प्राथमिक रूपातील ग्रहांना एकमेकांपासून दूर लोटू शकते. बहुतारकीय प्रणालीत फार कमी सौरमालाबाह्य ग्रह सापडले आहेत; पण ते आहेत हे मात्र नक्की, असे ते म्हणाले. केन यांनी हवाई येथील जेमिनी नॉर्थ ऑब्झर्वेटरी येथे ऑप्टिकल इमेजिंग तंत्राने चार तारकीय प्रणालींचा अभ्यास केला. प्रत्येक प्रणालीत त्यांना सौरमाला बाह्य ग्रह सापडले व त्यांच्या त्रिज्यात्मक वेगातील बदल पाहून कुठला तारा पृथ्वीपासून किती दूर व किती जवळ जात आहे, याचा अभ्यास त्यांनी केला.

## अंतराळात हायड्रोजनचे मोठे प्रवाह



आपल्या मिल्की वे या आकाशगंगेपासून जवळच म्हणजे २२ दशलक्ष प्रकाशवर्षे अंतरावर असलेल्या आकाशगंगेत कधी पाहिल्या नव्हत्या अशा हायड्रोजनच्या नद्या वाहत आहेत, असे खगोलवैज्ञानिकांनी म्हटले आहे.

अतिशय अंधूक वेटोळ्यासारखा दिसणारा हा हायड्रोजनचा प्रवाह एनजीसी ६९४६ या आकाशगंगेत आहे व त्यामुळे सर्पिलाकार दीर्घिका किंवा आकाशगंगा या संथ गतीने ताऱ्यांची निर्मिती कशी करीत राहतात याचा उलगडा होऊ शकणार आहे. वेस्ट व्हर्जिनिया विद्यापीठातील खगोलवैज्ञानिक डी. जे. पिसानो यांनी सांगितले की, ताऱ्यांचे इंधन हे दुसरीकडूनच तयार होऊन येत असते. आतापर्यंत अनेक आकाशगंगांमध्ये नेमके काय असते याच्या स्पष्टीकरणासाठी आवश्यक असलेली दहा टक्के माहिती आपल्याकडे आहे. हायड्रोजनच्या नद्या म्हणजे शीत प्रवाह हे आंतरदीर्घिकीय अवकाशातून



ताऱ्यांच्या निर्मितीसाठी उपलब्ध करून देत असावेत; पण हा हायड्रोजन इतका विरल असतो की तो शोधून काढणे अवघड असते. एनजीसी ६९४६ या पृथ्वीपासून २२ दशलक्ष प्रकाशवर्षे दूर असलेल्या दीर्घिकेतील हायड्रोजन प्रवाह हे सिफेअस व हंस तारकासमूहाच्या सीमेवर आहेत. त्यामुळे ताऱ्यांच्या निर्मितीसाठी नेमके इंधन कुठून मिळते व तशाच सर्पिलाकार दीर्घिकांमधील ताऱ्यांनाही ते कोठून मिळते हा प्रश्न कायम आहे. एनजीसी ६९४६ या दीर्घिकचा अभ्यास हा वेस्टरबोर्क सिंथेसिस रेडिओ दुर्बिणीने करण्यात आला असून, ही दुर्बीण नेदरलँड्स येथे आहे.

यात हायड्रोजनच्या प्रवाहामुळे निर्माण झालेली प्रभावळ दिसत आहे, जो अनेक सर्पिलाकार दीर्घिकांचा गुणधर्म असतो, दीर्घिकच्या चकतीसारख्या भागातून हायड्रोजन बाहेर टाकला जातो. तो ताऱ्यांची निर्मिती व अति नवताऱ्यांच्या स्फोटामुळे बाहेर पडतो. आता जो हायड्रोजनचा शीत प्रवाह सापडला आहे त्याचा स्रोत मात्र वेगळा असून, आंतरदीर्घिकीय अवकाशात असावा व दीर्घिकतील ताऱ्यांची निर्मिती व अतिनवताऱ्यांची प्रक्रिया यातून जी प्रचंड उष्णता बाहेर पडते त्यातून हायड्रोजनचा हा प्रवाह तयार होत असावा. अमेरिकी विज्ञान महासंघाच्या रॉबर्ट सी बायर्ड ग्रीन बँक टेलिस्कोप (जीबीटी) या दुर्बिणीचा वापर करून पिसानो यांना एनजीसी ६९४६ या दीर्घिकेतून बाहेर पडणारा हायड्रोजनच्या प्रवाहाचे अस्तित्व सिद्ध करणारा प्रकाश दिसून आला.

## चंद्रावर बनणार अणुऊर्जा केंद्र

वेगवेगळ्या कारणांसाठी चंद्र नेहमीच संशोधकांच्या अभ्यासात महत्त्वाचा विषय बनून राहिलेला आहे. आता चंद्रावर थेट अणुऊर्जा केंद्र उभारण्याची रशियाकडून तयारी सुरू आहे. याच मिशनमध्ये चीन आणि भारत हेही सहायक असणार आहेत. रशियाच्या आण्विक कार्पोरेशनच्या प्रमुखांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. भारत आणि चीन हे आमचे दोन्ही पार्टनर चंद्रावर आण्विक केंद्र उभारण्यासाठी उत्सुक असल्याचं रशियन आण्विक कार्पोरेशननं म्हटले आहे. सध्या या प्रोजेक्टची स्थिती काय आहे, तो किती काळात पूर्ण होईल, याची संपूर्ण माहिती सध्या तरी उपलब्ध नाही. पण, चंद्रावर जर खरोखरच आण्विक केंद्र उभारण्यात यश आलं तर ते मानवासाठी मोठं यश असेल तसेच भारताच्या चांद्रमोहिमेला उभारी देणारं असेल.

रशिया चंद्रावर अणुऊर्जा प्रकल्प बांधणार आहे. विशेष म्हणजे या प्रकल्पासाठी भारतही रशियासोबत हातमिळवणी करण्यास तयार आहे. रशियाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात भारताने उत्सुकता दाखवली आहे. या रशियन प्रकल्पाचा उद्देश चंद्रावर उभारल्या जाणाऱ्या तळाला ऊर्जा पुरवठा करणे हा आहे. रशिया आणि भारतासोबतच चीनही यात सहभागी होण्यास उत्सुक आहे. एकट्या रशियानं चंद्रावर अणुशक्ती केंद्र उभारण्याची



मोहीम हाती घेतली आहे. नंतर चीनला याच मोहिमेत सहभागी करून घेण्यात आलं. आता रशिया-चीनसोबतच भारतही या मोहिमेचा भाग असण्याची शक्यता आहे. यामागे अर्धा मेगावॅट अणुऊर्जा निर्मिती करण्याचा उद्देश असून, चंद्रावर अणुऊर्जा निर्माण करून ती इतर प्रोजेक्टसाठी वापरण्याचा उद्देश आहे. रशियाच्या न्यूक्लिअर कार्पोरेशनने भारतासोबत करार केला असून, चीन-भारत या मिशनमध्ये सहभागी होण्यासाठी उत्सुक असल्याचं रशियाकडून सांगण्यात आलं. चंद्रावर २०४०- पर्यंत माणसाला पाठवण्याचं भारताचं मिशन आहे. चंद्रावर ऊर्जेचं संकट सोडवण्यासाठी आण्विक ऊर्जा प्रकल्प उभारण्याच प्रयत्न आहे. चंद्रावर स्थापन केल्या जाणाऱ्या अणुऊर्जा केंद्राची सध्या निर्मिती केली जात आहे. रशियाची राज्य अणू निगम रोसाटॉम या प्रकल्पाचे नेतृत्व करीत आहे. चंद्रावर बांधण्यात येणारा हा पहिला अणुऊर्जा प्रकल्प अर्धा मेगावॅट वीज निर्मिती करेल आणि ही वीज चंद्रावर बांधलेल्या तळावर पाठवली जाईल. हा प्लांट २०३६ पर्यंत बांधला जाईल. रशियाची सरकारी न्यूज एजन्सी टीएएसएस नुसार, रोसाटॉमचे प्रमुख ॲलेक्स लिखाचेव्ह म्हणाले की, आंतरराष्ट्रीय समुदायासोबतच चीन आणि भारताने या प्रकल्पात खूप रस दाखवला आहे. रशियाची अंतराळ संस्था रोसकॉसमॉसने चंद्रावर अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू असल्याचे जाहीर केले आहे. यासाठी रशिया आणि चीन संयुक्तपणे काम करत आहेत. २०३६ पर्यंत ते चंद्रावर स्थापित केले जाईल.

## हस्ताक्षरातील अग्रणी

जगातील सुंदर हस्ताक्षर म्हणून काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. हे कॉम्प्युटरवर टाईप केल्यासारखे दिसते, अशी टिप्पणी करावी, इतके हे हस्ताक्षर सुंदर आहे. एका नेपाळी शाळकरी मुलीचे हे हस्ताक्षर पाहून हस्तलेखन तज्ज्ञही आश्चर्य व्यक्त करत आहेत.

हस्तलेखन हा शिक्षणाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. विद्यार्थ्यांच्या चांगल्या हस्ताक्षराचे शिक्षकही कौतुक करतात; पण प्रत्येकाची हस्ताक्षराची शैली वेगळी असते. नेपाळी शाळकरी मुलीचे हस्ताक्षर जगातील सर्वात सुंदर हस्ताक्षर म्हणून गौरवण्यात आले आहे. प्रकृती मल्ला असे या विद्यार्थिनीचे नाव. तिच्या हस्ताक्षरामुळे ती चर्चेत आहे.

सुंदर प्रकृती आता १६ वर्षांची आहे. नेपाळमधील सैनिक वस्य महाविद्यालयात इयत्ता दहावीमध्ये शिकत आहे. प्रकृती मल्ला वयाच्या १४ व्या वर्षी तिच्या अप्रतिम हस्ताक्षराने सोशल मीडियावर व्हायरल झाली. तिच्या उत्कृष्ट हस्ताक्षराने जगाचे लक्ष वेधून घेतले. तिचे हस्ताक्षर पाहून आश्चर्यचकित झालेल्या एका व्यक्तीने लगेचच फोटो काढून सोशल मीडियावर शेअर केला. आता पुन्हा ही सही आणि हस्ताक्षर



सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. प्रकृती तिच्या हस्ताक्षरामुळे रातोरात जगप्रसिद्ध झाली.

नेटिझन्स या पोस्टला मोठ्या प्रमाणात लाईक आणि कमेंट करत आहेत.

नेटिझन्स कमेंट करत आहेत की, ते कॉम्प्युटरवर टाईप केले आहे. प्रकृतीच्या हस्ताक्षराला नेपाळ सरकारने नेपाळमधील सर्वोत्कृष्ट कॅलिग्राफी म्हणून मान्यता दिली आहे. तिच्या अनोख्या हस्ताक्षर आणि स्वाक्षरीसाठी नेपाळमध्ये तिने अनेक पुरस्कार जिंकले आहेत. तिचे हस्ताक्षर पाहून हस्तलेखन तज्ज्ञही आश्चर्य व्यक्त करत आहेत. तिचे हस्ताक्षर पाहिल्यानंतर तज्ज्ञांनी सांगितले, प्रत्येक अक्षरातील अंतर समान आहे. त्यामुळे या विद्यार्थिनीचे हस्ताक्षर केवळ नेपाळमध्येच नव्हे, तर संपूर्ण जगात सर्वोत्तम मानले जाते.

# ज्ञान, विज्ञान व कौशल्य विकासातून ग्रामीण प्रगती शक्य

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन; 'देह वेचावा कारणी' आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन लोणीत

शिर्डी – ग्रामीण विकासाचा निर्देशांक १२ टक्क्यांवरून २६ टक्क्यांवर नेण्यासाठी शिक्षणासोबत विज्ञान, तंत्रज्ञान आणि कौशल्य विकासावर भर देणे अत्यावश्यक आहे. जलसंधारण, सेंद्रिय शेती आणि सौरऊर्जेसारख्या उपाययोजनांनी ग्रामीण भागात सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.



लोणी येथे स्वर्गीय पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील लिखित 'देह वेचावा कारणी' या आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन गडकरी यांच्या हस्ते झाले.

लोणी येथे स्वर्गीय पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील लिखित 'देह वेचावा कारणी' या आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन गडकरी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, आमदार शिवाजीराव कर्डीले, आ. मोनिका राजळे, आ. काशिनाथ दाते, आ. विठ्ठलराव लंघे, आ. विक्रमसिंह पाचपुते, आ. अमोल खताळ, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, सौ. शालिनी विखे पाटील, सौ. सुवर्णा विखे पाटील, ध्रुव विखे पाटील आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि बाळासाहेब विखे पाटील यांचे कार्य प्रेरणादायी आहे. ग्रामीण भागातील स्थलांतर थांबवायचे असेल तर विकासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शेतीच्या व्यवस्थेत मूलभूत सुधारणा केल्यास शेतकरी आत्मनिर्भर बनतील. विदर्भातील जलसंधारणामुळेच शेतकरी उर्जादाता बनत आहेत.

ते पुढे म्हणाले की, रासायनिक खतांमुळे जमीन खराब होत आहे. सेंद्रिय शेतीला आणि सौरऊर्जेला प्राधान्य द्यावे लागेल. दुग्ध व्यवसायासाठी नवे वाण वापरल्यास शेतकऱ्यांना नवा मार्ग मिळू शकतो. ग्रामीण–शहरी दरी मिटवण्यासाठी रस्त्यांचा विकास आणि जलसंधारण ही दोन महत्त्वाची शस्त्रे ठरतील.

जिल्ह्यातील रस्ते योजनांबाबत गडकरी म्हणाले की, नांदूर शिंगोटे, सिन्नर आणि सुरत–चेन्नई मार्गांसह जिल्ह्यातील सर्व रस्त्यांची कामे पूर्ण केली जातील. त्यासाठी स्थानिकांना खर्च करावा लागणार नाही. या कामांबरोबरच जलसंधारणाच्या उपक्रमांनाही आमच्या मंत्रालयाकडून मदत दिली जाईल.

गडकरी म्हणाले, लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी सहकारातून शैक्षणिक प्रकल्प उभारून ग्रामीण भागात परिवर्तन घडवले. त्यांचे आत्मचरित्र म्हणजे सामाजिक बांधिलकी आणि त्यागाचे प्रतिबिंब आहे. देशात सध्या विचारशून्यता ही मोठी समस्या बनली असून, अशा स्वच्छ विचारसरणीच्या नेतृत्वाची गरज आहे.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, स्वर्गीय पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांचे आत्मचरित्र म्हणजे पन्नास वर्षांच्या राजकीय व सामाजिक वाटचालीचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. त्यांच्या नावाने राष्ट्रीय स्तरावर सहकार, कृषी, शिक्षण आणि जलसंधारण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्यात येणार आहे. या समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी गडकरींनी स्वीकारली आहे.

कार्यक्रमात माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जिल्हा बँकेच्यावतीने सत्कार

भाजप अहिल्यानगर जिल्हा कार्यालय इमारतीचे भूमीपुजन समारोह प्रसंगी यशवंतराव चव्हाण सहकार सभागृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. याप्रसंगी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने बँकेचे चेअरमन आ. शिवाजीराव कर्डिले यांनी त्यांचा सत्कार करुन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष व जलसंपदा तथा पालक मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, भाजप महाराष्ट्र प्रदेशाचे कार्यकारी अध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांचाही सन्मान सत्कार आ. शिवाजीराव कर्डिले यांनी केला.

## ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ११ मे रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक

नगर – जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ११ मे रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांनी कळविले आहे.

## विनयभंग गुन्ह्यातील आरोपीचा अटकपुर्व जामीन अर्ज मंजूर

पाथर्डी – येथील महिला एकटीच शेतात काम करत असताना आरोपीने फायदा घेवून महिलेचा विनयभंग करून तिला लज्जा उत्पन्न होईल, असे गैरकृत्य म्हणून पाथर्डी पोलीस स्टेशन येथे आरोपी आण्णासाहेब दुर्योधन थोरात (रा.दंडेवाडी, ता. पाथर्डी, जि अ.नगर) याच्याविरूद्ध बीएनएस २०२३ चे कलम अन्वये गुन्हा दाखल झालेला होता. सदर आरोपीस जामीन मिळण्याकरिता अ‍ॅड. सचिनदेवा पाठक यांच्यामार्फत अ.नगर जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिन अर्ज दाखल केला होता. असत्य तथा बनावट कथनाच्या आधारे फिर्यादीने गुन्हा दाखल केला होता तसेच आरोपीने कुठल्याही प्रकारे गैरकृत्य विनयभंग, गैरकृत्य केले नाही. अशा व इतर पुरावे न्यायालयात दाखल करून यशस्वीपणे युक्तीवाद केला. असत्य चुकीच्या कथनाच्या आधारे सदर आरोपीवर गंभीर गुन्हा दाखल केलेला आहे व इतर महत्त्वाचा गोष्टी न्यायालयाच्या नजरेस आणून दिल्या. या आधारे व अ‍ॅड. सचिन पाठक यांनी केलेला युक्तीवादाच्या आधारे जिल्हा न्यायालयाने आरोपीचा गंभीर गुन्ह्यातील अटकपूर्व जामिन अर्ज मंजूर केला.

# शिक्षकांचे समाधान विद्यार्थ्यांच्या यशात असते : रामकिसन देशमुख

## डॉ. पाऊलबुद्धे महाविद्यालयाचे प्राचार्य भरत बिडवे यांचा सेवापूर्ती सन्मान

नगर – विश्रांती निषिद्ध आहे, असे महात्मा गांधींनी सांगितले. त्याप्रमाणे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे आमचे सर्वांचे प्रेरणास्थान असणारे स्व. डॉ. नाथ पाऊलबुद्धे यांनी शिक्षणाच्या प्रचारासाठी अविश्रांतपणे काम केले. त्यांची प्रेरणा घेऊन या संस्थेचे संचालक, शाळेतील सर्व शिक्षक स्वतःला झोकून देत काम करतात त्यामुळेच ही संस्था नावारूपाला आली. शिक्षकांच्या अथक परिश्रमामुळे या विद्यालयातील असंख्य विद्यार्थी उच्च पदावर कार्यारत झाले. त्यांनी स्वतःचे नाव उंचावुन शाळेचे देखील नावलौकिक वाढविले. शिक्षकांचे खरे समाधान हे विद्यार्थ्यांच्या यशात असते, असे प्रतिपादन संस्थेचे सह सचिव रामकिसन देशमुख यांनी केले.



अहिल्यानगर येथील डॉ. ना. ज. पाऊलबुद्धे माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालयाचे प्राचार्य भरत बिडवे यांचा सेवापूर्ती निमित्त संस्था व शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. (छाया – विजय मते)

अहिल्यानगर येथील डॉ. ना.ज. पाऊलबुद्धे माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालयाचे प्राचार्य भरत बिडवे यांचा सेवापूर्ती निमित्त संस्था व शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सेवा शिक्षक प्रसारक मंडळाचे सह सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार प्रा. दादासाहेब भोईटे, बाळकृष्ण सिद्दम, रघुनाथ कारमपुरी, शैक्षणिक संकुल प्रमुख डॉ.रेखाराणी खुराणा तसेच सर्व युनिटचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक वृंद उपस्थित होते.

श्री. देशमुख म्हणाले संस्था उभारणीपासून भरत बिडवे हे स्व.डॉ.नाथ पाऊलबुद्धे यांच्याबरोबर काम करीत होते. त्यांच्या कामाची पद्धत, घेतलेल्या अनुभवामुळे बिडवे सरांनी देखील आपली शाळा म्हणून काम करताना थोडा देखील अभिमान बाळगला नाही. मुख्यध्यापक असताना ज्यावेळी शाळेचे बांधकाम सुरू होते त्यावेळी बांधकामावर पाणी मारायला ते स्वतःहून पुढे येत. खेळाचे मैदानाची सुद्धा साफसफाई करताना ते मागेपुढे पाहत नव्हते. अण्णांच्या कार्याचा वसा ते जोपासत, आज जरी ते सेवानिवृत्त झाले तरीही संस्थेकरीता त्यांचे काम सुरू राहणार, असे मला वाटते.

संस्थेचे खजिनदार दादा भोईटे, डॉ. रेखाराणी खुराणा, प्रा.आशा गावडे आदिंसह अनेकांनी आपल्या मनोगता मधून सरांबरोबर काम करताना आलेल्या गोड आठवणींना उजाळा दिला.

सत्काराला उत्तर देताना भरत बिडवे म्हणाले की, मी शासकीय कागदोपत्री शाळेतून सेवानिवृत्त झालो, आपला सहवास नसणार, पण तुमच्या सोबत मी असणार, तुम्ही फक्त सेवेतुन मला निरोप दिला. पण नाती कधी तुटणार नाही. गेली तीस वर्षे शिक्षक चार वर्षे प्राचार्य म्हणून काम केले. मला काम करण्याची इतकी सवय झाली आहे, की ती लवकर तुटणार नाही. माझी शाळा, माझे विद्यार्थी, सर्व सहकारी शिक्षक यांना भेटल्याशिवाय मला राहवणार नाही, यापुढेही माझे काम सुरूच ठेवीन असे म्हणताच सर्वांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

# सेवावस्तीतील विद्यार्थ्यांची यशस्वी झेप

## बालभवनच्या १२ वीच्या निकालात ७०.५८% सह घवघवीत यश; कोणतेही क्लासेस न लावता, फक्त मेहनतीवर मिळवलेले हे यश आज अनेकांना प्रेरणा

नगर – स्नेहालय संचलित बालभवन प्रकल्प अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी यावर्षीच्या १२वीच्या (एच.एस.सी) परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या या परीक्षेत, अत्यंत प्रतिकूल आणि शैक्षणिक सुविधांपासून वंचित सात सेवावस्तीतील ३४ विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षा दिली. त्यापैकी २४ विद्यार्थ्यांनी चांगल्या गुणांसह उत्तीर्ण होत ७०.५८% निकाल नोंदवला आहे.



स्नेहालय संचलित बालभवन प्रकल्प अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी यावर्षीच्या १२वीच्या (एच.एस.सी) परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे.

या विद्यार्थ्यांनी कोणतेही खाजगी क्लासेस न लावता, केवळ नियमित अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. शिक्षण घेण्यासाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध नसताना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या गुणवंत मुलांनी आपले स्वप्न साकार करत सर्वांचे कौतुक मिळवले आहे.

शाखानिहाय निकाल पुढीलप्रमाणे: विज्ञान शाखा: ६ विद्यार्थी, वाणिज्य शाखा: ९ विद्यार्थी, कला शाखा: १९ विद्यार्थी.

प्रमुख यशस्वी विद्यार्थ्यांची नावे: कु. जेबा नसीर शेख (विज्ञान शाखा) – ६९.३३% – प्रथम क्रमांक, आलिया फईम शेख (वाणिज्य शाखा) – ६७.६४% – प्रथम क्रमांक, सानिया संपत सकट (वाणिज्य शाखा) – ६४.६७% – तृतीय क्रमांक.

या यशामध्ये बालभवनच्या सर्व शिक्षक व मार्गदर्शकांचा मोलाचा वाटा असून, त्यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन आणि आधार दिला. बालभवन प्रकल्प हा केवळ शिक्षणापुरता मर्यादित नसून, आरोग्य, संस्कार व रोजगार या सर्व पैलूंवर लक्ष केंद्रित करणारा सामाजिक उपक्रम आहे.

प्रकल्प व्यवस्थापिका उषा खोल्लम, एडमीन हेड राजू पांढरे, उमेद समन्वयक यास्मिन शेख, शिक्षक समन्वयक प्रतीक्षा साळवे, समुपदेशिका रुबिनास शेख, मिसबा शेख आणि सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांना पेढे भरवून शुभेच्छा दिल्या.

स्नेहालय अनिवासी प्रकल्पाचे संचालक हनीफ शेख, बालभवनच्या संचालिका वैशाली चोपडा तसेच संपूर्ण टीमने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



पी.ए.इनामदार स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज मध्ये महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.

## पी.ए.इनामदार स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज मध्ये महाराष्ट्र दिन साजरा

नगर – इकरा एज्युकेशन अ‍ॅण्ड वेल्फेअर सोसायटी संचालित पी.ए.इनामदार स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज, गोविंदपुरा, अहिल्यानगर येथे महाराष्ट्र दिना निमित्त सकाळी झेंडावदनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या वेळेस शाळेचे प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य फिरोसअली यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा देत आजच्या समाजात शिक्षणाच्या नवकल्पनांविषयी माहिती दिली. त्यांनी समाजासाठी उपयुक्त नवीन अभ्यासक्रम बाबत चर्चा केली, ज्यामध्ये वेगवेगळ्या शैक्षणिक विषयावर काम करण्यावर भर देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत यांनी झाली. यावेळी ध्वजारोहण करण्यात आले. उपप्राचार्या फरहाना शेख यांनी मुख्य पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# पं.हृदयनाथ मंगेशकर व सावनी रवींद्र यांच्या 'द मंगेशकर्स' मैफिलीत हरपून गेले नगरकर

नगर – मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या सुहास्य तुझे मनास मोही...या गाण्याच्या चालीवर ज्येष्ठ कवी सुरेश भट यांनी मी मज हरपून बसले गं... शब्दरचना केली... पं.हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीत दिले आणि ही दोन्ही मंगेशकरांची गाणी गायिका सावनी रवींद्रने ताकदीने सादर केली...व नगरकर संगीत रसिकांना सुरांच्या या वर्षावात हरपून गेल्याची अनुभूती आली.... ठिकाण होते– अहिल्यानगरचे माऊली संकुल आणि निमित्त होते विचारभारती व चैतन्य फाउंडेशन आयोजित 'द मंगेशकर्स' मैफिलीचे. सायंकाळी ८:३० वाजता सुरु झालेल्या या मैफलीत ज्येष्ठ संगीतकार पं.हृदयनाथ मंगेशकर व गायिका सावनी रवींद्र यांनी रसिकांना मध्यरात्रीपर्यंत खिळवून ठेवले. पहेलगाम हल्लयात मृत्युमुखी पडलेल्या भारतीयांना व माजी आमदार अरुण जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



ज्येष्ठ संगीतकार पं.हृदयनाथ मंगेशकर व गायिका सावनी रवींद्र यांच्या द मंगेशकर्स' संगीत मैफिलीत रसिक नगरकर हरपून गेले.

चैतन्य फाउंडेशन या संस्थांनी राष्ट्रीय पारितोषिक विजेत्या गायिका सावनी रविंद्र यांच्या अनाहत निर्मित 'द मंगेशकर्स' संगीत मैफिलीचे आयोजन येथे केले होते. या मैफिलीला खुद्द भावगंधर्व पंडित हृदयनाथ मंगेशकर यांची उपस्थिती नगरकरांना अनमोल भेट देऊन गेली. मंगेशकर परिवाराची विविध गाणी व जुन्या आठवणींचा पट पंडितजींनी उलगडला आणि नगरकरांसाठी ती अनोखी मेजवानीच ठरली. यावेळी निवेदिका दीप्ती भागवत यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरातून पं.हृदयनाथ मंगेशकर यांनी मराठी व हिंदी चित्रपट सृष्टीला वैभव प्राप्त करण्यासाठी मंगेशकर घराण्याच्या योगदानाची माहिती दिली. ९० वर्षांच्या पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या तल्लख स्मरणशक्तीचा अनुभव नगरकर रसिकांना आला.

मास्टर दीनानाथ मंगेशकर यांनी सुहास्य तुझे...गाणे केले होते, त्याच चालीवर त्यांचे चिरंजीव पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी सुरेश भट यांना शब्दरचना करायला लावून आशा भोसले यांच्या आवाजात मी मज हरपून बसले गं... गाणे केल्याची आठवण एकीकडे पंडितजी जागवत असताना दुसरीकडे सावनीने दोन्ही गाण्यांची सुरुवात एकापाठोपाठ आळवली आणि नगरकर संगीत रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात या रचनेला दाद दिली.

संगीताच्या दुनियेत प्रसिद्ध परिवार असलेल्या मंगेशकर कुटुंबातील लतादीदी, आशाताई, मीनाताई, उषाताई व पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी गायलेली व संगीतबद्ध केलेली मराठी व हिंदी रचनांचे गायन गायिका सावनी रवींद्र यांनी या मैफलीत केले. यात शुरा मी वंदिले, राम कहीये गोविंद कहीये, कर्म की गती न्यारी, काय बाई सांगू, धेनू घेऊन जाय, का रे दुरावा, माझा होशील का या गाजलेल्या गीतांबरोबरच सांग सांग भोलानाथ, छडी लागे छम छम ही प्रसिद्ध बालगीते सदर केली. तसेच जय देव जय देव जय शिवराया ही छत्रपती शिवरायांची आरती, हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा या गीतांनी वातावरण प्रफुल्लित केले. पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचे लाजून हसणे अन हसून ते पाहणे...हे अजरामर गीत सावनीने उत्कृष्टपणे सादर करून मैफिलीत बहार आणली.

उषा मंगेशकरांनी स्वरबद्ध केलेल्या छबीदार छबी, मला लागली कुणाची उचकी.. या ठसकेबाज लावणीला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेत ढोलकीला शिट्ट्यांनी दाद दिली. तुम्हावर केली मर्जी बहाल, नभ उतरू आलं, जांभुळ पिकल्या झाडाखाली, आम्ही ठाकर ठाकर, लिंगोबाचा डोंगूर आभाळी गेला, या मराठी गाण्यांसह रहे ना रहे हम मेहका करेंगे, रुके रुके से कदम, दिलबर दिल से प्यारे, जिया जले जान जले... या रंगलेल्या मैफिलीची सांगता स्वराज्य तोरण चढे मराठी पाऊल पडते पुढे... या गाण्याचे झाली तेव्हा सभागृहाने उभे राहून टाळ्याच्या कडकडाटात कलावंतांना दाद दिली.

दीप्ती भागवत यांनी रसाळ निवेदनात विविध गाण्यांची वैशिष्ट्ये सांगून मैफल अधिक रंगवली. या मैफिलीत नितीन शिंदे यांचे ढोलकी वादन नगरकरांना मंत्रमुग्ध करून गेले. याशिवाय केदार परांजपे, अमर वानखेडे, अमित साळवे, अभिजीत भदे, प्रणव हरदास यांची वाद्य साथसंगत प्रभावी होती.

विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी यांनी स्वागतात विचार भारतीच्या उपक्रमांची व आगामी होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. ज्येष्ठ सभासद रवींद्र मुळे यांच्या हस्ते पं.हृदयनाथ मंगेशकर यांचा व दर्शना चंदे यांनी कलावंतांचा सन्मान केला. या मैफिलीच्या यशस्वीतेसाठी चैतन्य फाउंडेशनचे अध्यक्ष अनंत देसाई, विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे, अशोक गायकवाड, अनिल मोहिते, महेंद्र जाखेटे, विशारद पेटकर, उदय भणगे, अंकुश गोळे, बाबासाहेब वाकळे, रवींद्र बारस्कर, श्रीगोपाल जाखोटिया व सदस्यांनी परिश्रम घेतले.

या मैफिलीत भावगंधर्व पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी दिलखुलास संवाद रंगवला. लता, आशा, मीना व उषा या बहिणींच्या गायनाची वैशिष्ट्ये स्पष्ट केली. नवोदित गायकांनी जुन्या गायकांच्या शैलीची नक्कल करण्यापेक्षा स्वतःची स्वतंत्र गायन शैली विकसित करण्याचा सल्ला त्यांनी दिला. नगरच्या भेटीच्या जुन्या आठवणीही त्यांनी जागवल्या. वडील मास्टर दीनानाथ यांच्या निधनानंतर बारा वर्षाच्या लतादीदीने सावरलेले कुटुंब व संगीत क्षेत्रात मंगेशकर परिवाराने दिलेल्या योगदानाच्या आठवणी त्यांनी जागवल्या. सध्या प्रत्येक क्षेत्रात कमी–जास्त प्रमाणात भ्रष्टाचार होतो असतो. मात्र संगीतात तो करता येत नाही. कारण, गायक व वादकांना त्यांचे जे सर्वोत्तम आहे, तेच द्यावे लागते तरच रसिक त्यांना डोक्यावर घेतात, नाहीतर पायदळी तुडवतात. त्यामुळे संगीत सूरात भ्रष्टाचार होत नाही, असे भाष्य त्यांनी करताच टाळ्यांची दाद त्यांना मिळाली. यावेळी त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयोस्तुते श्रीमहन्मंगले... या कवितेच्या निर्मितीची कथाही सांगितली.

# गरोदर राहण्यासाठी महिला येतात ' या ' गावात !

समुद्रसपाटीपासून कैक हजार फूट उंचीवर असणाऱ्या आणि पर्यटकांसाठी कोणत्याही ऋतूमध्ये नवे रुप समोर आणणाऱ्या लडाखविषयी अनेकांना कायम अप्रूप वाटते. नैसर्गिक सौंदर्याबरोबरच निसर्गाचे रौद्र ते अगदी निर्मळ रुप दाखवणाऱ्या या भागाला आजवर असंख्य पर्यटकांनी भेट दिली; पण आजही लडाखमधील काही गावे मुख्य प्रवाहापासून दूर आपल्याच अनोख्या विश्वात रममाण आहेत. आधुनिक जगाशी त्यांचा थेट संबंध नाही. असे असूनही ही गावे आकर्षणाचा केंद्रबिंदू मात्र आहेत. जगभरातील प्रवासवेडी मंडळी आणि ट्रेकर्ससाठी महत्त्वाच्या अशा या लडाखमध्ये एक गाव असेही आहे. तिथे परदेशी महिलांचा अधिक वावर पहायला मिळतो. या महिला इथे एका खास कारणासाठी येतात. हे कारण असते ते म्हणजे गर्भधारणेचे.



लडाखच्या कारगिल क्षेत्रापासून साधारण ७० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या एका गावाकडे या परदेशी महिलांचा सर्वाधिक ओघ असतो. हे गाव या क्षेत्रात आर्यन व्हॅली किंवा आर्य व्हॅली म्हणून ओळखले जाते. लडाखच्या पर्वतांनी वेढलेल्या या भागात युरोपीय महिलांचा सर्वाधिक वावर पाहायला मिळतो. विविध संदर्भांमध्ये आढळणाऱ्या उल्लेखानुसार सिकंदराच्या सैन्यातील जवानांप्रमाणे चांगली शरीरयष्टी, भक्कम बांधा आणि निरोगी देहबोली असणाऱ्या तरुणांकडून गर्भधारणेसाठी परदेशी महिला या गावाची वाट धरतात आणि गर्भधारणेनंतर आपल्या देशी परततात. सुरुवातीच्या काळात या कोणालाच या समुदायाविषयी फार माहिती नव्हती; पण इंटरनेटच्या उपलब्धतेमुळे या गावाची चर्चा संपूर्ण जगात झाली आणि परदेशी महिलांचे येथे येण्याचे प्रमाण वाढले. येथे याच कारणास्तव पर्यटनाला वाव मिळत असून स्थानिकांना आर्थिक मदत देऊ केली जाते असेही सांगण्यात येते.

**या खोऱ्याचे वैशिष्ट्य ?**

लडाखच्या आर्यन व्हॅलीमध्ये ब्रोक्पा समुदायाचे अस्तित्व असून ही मंडळी अलेक्झांडर द ग्रेट (जगज्जेता सिकंदर) याच्या लष्कराचे वंशज म्हणवले जातात. इतकेच नव्हे, तर येथील स्थानिकांच्या मते ते जगातील ज्ञात असे सर्वात शुद्ध आर्यवंशीय आहेत. सिकंदर भारतातून पुढे जात होता, तेव्हा त्याच्या सैन्यातील काही तुकड्या इथेच थांबल्या आणि हा समुदाय म्हणजे त्यांचेच वंशज आहेत, असे म्हणतात.

**अंगकाठी, चेहरेपट्टीही वेगळी**

लडाखमधील या समुदायाची अंगकाठी आणि चेहरेपट्टी इतरांपेक्षा काहीशी वेगळी असून, त्यांची भाषा आणि संस्कृतीसुद्धा वेगळी आहे. या संस्कृतीमध्ये त्यांच्या सणवारांची लेखी नोंद ठेवण्यात आलेली नाही. ही सर्व माहिती मौखिक स्वरुपात पुढील पिढीकडे सुपूर्द केली जाते. ब्रोकस्केट ही येथील स्थानिकांची भाषा.

# माजी मुख्यमंत्री सामान्य प्रवाशांसारखी रेल्वेची वाट पाहतात तेव्हा..!



मुख्यमंत्री, नेते, पंतप्रधान, राष्ट्रपती, माजी मुख्यमंत्री आदींनी कुंभमेळ्यात शाही स्नानाचा सरकारी इतमामात आनंद लुटला. सुरक्षा व्यवस्थेत शाही स्नान केले. त्यांना गर्दीचा त्रास झाला नाही; परंतु त्यांच्यामुळे अनेकांना त्रास झाला. त्याला अपवाद ठरले एक माजी मुख्यमंत्री. त्यांचे नाव अर्जुन मुंडा. शाही स्नान झाल्यानंतर ते बडेजाव टाळून फलाटावरील एका बाकावर सामान्य प्रवाशासारखे बसून चक्क रेल्वेची वाट पहात होते...

देशभरातून लाखो, कोट्यवधी भाविकांनी कुंभमेळ्याला जाऊन दर्शन घेतले. गंगा नदीतील पवित्र कुंडात डुबकी घेऊन स्नान केले. पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांसह अनेक दिग्गज नेतेमंडळी, सेलिब्रिटी, आमदार-खासदारही कुंभमेळ्यात सहभागी होऊन धार्मिक पर्यटनाचा आनंद घेत होते. प्रयागराजमधील कुंडात डुबकी घेतलेल्या अनेक नेत्यांचे फोटो 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कुंभमेळ्यात सपत्नीक स्नान केले. एकनाथ शिंदे हे सहकाऱ्यांसह गंगा स्नानाला आले होते.

**प्रवाशांच्या गर्दीत असमान्याचा सामान्य चेहरा**

कुंभमेळ्यासाठी प्रयागराजमध्ये मोठी गर्दी उसळली होती. रेल्वे स्थानक असो, विमानतळ असो किंवा बसस्थानक; सर्वत्र प्रवासीच प्रवासी दिसत होते. त्यातच प्रयागराज रेल्वे स्थानकावरील एका प्रवाशाचा फोटो व्हायरल झाला. माजी केंद्रीय मंत्री आणि माजी मुख्यमंत्री अर्जुन मुंडा एका रेल्वे स्टेशनवर ट्रेनची वाट पहात असल्याचे पहायला मिळाले. ते सर्वसामान्य प्रवाशांसह आपल्या पत्नीसमवेत एका कठड्यावर बसले होते. पत्नी मीरा यांच्यासह त्यांनी प्रयागराज येथील पवित्र कुंडात स्नान केले. येथे दर्शन घेतल्यानंतर आणि अध्यात्मिक डुबकी मारल्यानंतर ते परतीच्या प्रवासासाठी प्रयागराज रेल्वे स्थानकावर गाडीची वाट पाहत होते. या वेळी, अनेक प्रवासी त्यांच्याजवळून गेले; पण कोणालाही त्यांची ओळख लक्षात आली नाही. विशेष म्हणजे अंगावर शाल ओढून ते इकडे-तिकडे पहात होते. यावरुन, त्यांच्या साधेपणाची चर्चा आणि कौतुक झाले.

**'व्हीआयपी' सुरक्षेशिवायचा साधेपणा**

मुंडा यांची ओळखच सर्वसामान्यांचा नेता अशी आहे. आपल्या मतदारसंघातही ते नागरिकांसोबत कुठेही सहज रममाण होतात. त्यामुळेच कुंभमेळ्याला पत्नीसोबत आल्यानंतर त्यांनी कुठलीही व्हीआयपी सुरक्षा घेतली नाही किंवा 'व्हीआयपी' असल्याचा आव आणला नाही.

# कॅलिडोस्कोप

# जगातील पहिला मानव कोण ?

विज्ञानानुसार जगातील पहिला मानव 'होमो हॅबिलिस' होता. त्याचे अवशेष आफ्रिकेत सापडले आहेत आणि त्याचे वय सुमारे २.८ ते १.४ दशलक्ष वर्षे जुने आहे.

होमो हॅबिलिस हा जगातील पहिला मानव मानला जातो, कारण दोन पायांवर चालण्यास सक्षम असणारा हा पहिला प्राणी होता. 'होमो सेपियन्स' हा आधुनिक मानवाचा पूर्वज मानला जातो. आज अस्तित्वात असलेल्या आपल्या सर्वांना 'होमो सेपियन्स' मानले जाते. त्याच्या बुद्धिमत्तेचा सर्वाधिक विकास झाला. 'होमो सेपियन्स'चे अवशेषही आफ्रिकेत सापडले आहेत आणि त्याचे वय सुमारे तीन लाख वर्षे आहे.



'होमो सेपियन्स' हा आपला पूर्वज मानला जातो. कारण तो आपल्या सर्वांसारखा दिसणारा पहिला प्राणी होता. लोक एकमेकांना भेटतात आणि बोलतात, तेव्हा आपले विचार हस्तांतरित होतात. 'होमो सेपियन्स'चा विकास अशाच प्रकारे झाला आहे.

**माणूस कसा विकसित झाला?**

'होमो सेपियन्स' हे पाच वेगवेगळ्या प्रजातींमधून तयार झाले आणि या सर्वांच्या वैशिष्ट्यांची सांगड घातल्यानंतर एक बुद्धिमान माणूस विकसित झाला. लोक एकमेकांना भेटतील, विचारांची देवाणघेवाण होईल, तोपर्यंत त्यांचा विकास होत राहणार. डार्विनचे वैज्ञानिक स्पष्टीकरणदेखील असे आहे की मानवी इतिहास हा क्रमिक विकास आणि बदलांचा आहे.

**'होमो निॲंडरथॅलेन्सिस' कोण होते?**

'होमो निॲंडरथॅलेन्सिस'ला देखील मानवाचे पूर्वज मानले जाते. कारण ते 'होमो सेपियन्स'सह अस्तित्वात होते. त्यांचे पुरावे युरोप आणि आशियामध्ये सापडले आहेत. त्यांचे वय सुमारे चार लाख ते ४० हजार वर्षे आहे.

# विमान ' टेकऑफ ' आणि ' लँडिंग ' करताना पायलटचे थरतात हातपाय !

विमान हे प्रवासाचे सर्वात जलद माध्यम आहे. भारतामध्ये विविध राज्यांमध्ये मिळून एकूण १३७ विमानतळ आहेत. यापैकी ३४ आंतरराष्ट्रीय विमानतळ, दहा सीमाशुल्क विमानतळ, ८१ देशांतर्गत विमानतळ आणि २३ संरक्षण हवाई क्षेत्रांमधील विमानतळांचा समावेश आहे. यातील काही एअरपोर्ट खूपच धोकादायक आहेत. या विमानतळांच्या परिसरातील भौगोलिक रचना अत्यंत धोकादायक आहे. यामुळे तेथे 'टेक ऑफ' आणि 'लँडिंग' करताना पायलटचे हात पाय थरथरतात.



* लेंगपुई विमानतळ

मिझोरममध्ये असलेले लेंगपुई विमानतळ भारतातील सर्वात धोकादायक विमानतळांपैकी एक आहे. या विमानतळाच्या धावपट्टीखाली सतत पाण्याचे प्रवाह वाहत असतात. त्यामुळे पावसाळ्यात परिस्थिती आणखी धोकादायक बनते. अशा वातावरणात येथे विमानांचे 'टेकऑफ' आणि 'लँडिंग' करणे वैमानिकांसाठी एखाद्या कठीण परीक्षेपेक्षा कमी नसते.

* लेह रिम्पोची विमानतळ

जम्मू-काश्मीरमधील लेह येथे असलेले रिम्पोची विमानतळ देशातील सर्वात उंच आहे. हे विमानतळ ३२५९ मीटर उंचीवर आहे. येथे 'टेक ऑफ' आणि 'लँडिंग' करणे हा पायलटसाठी अत्यंत धोकादायक अनुभव असतो. जास्त उंची आणि क्षणाक्षणाला बदलणारे वातावरण यामुळे येथे विमान नियंत्रित करणे खूप कठीण असते.

* कांगडा विमानतळ

हिमाचल प्रदेशमधील कांगडा येथे असलेले कांगडा अर्थात गग्गल विमानतळ २४९२ फूट उंचीवर आहे. याची धावपट्टी खूपच धोकादायक आहे. बदलते हवामान आणि उंचीमुळे वैमानिकांना येथे खूपच सतर्क रहावे लागते.

* मंगलोर विमानतळ

मंगलोर विमानतळ हे 'टेबलटॉप' विमानतळ म्हणून ओळखले जाते. २०१० मध्ये येथे एक भीषण विमान अपघात झाला. यावरुनच हा विमानतळाचे धोकादायक स्वरूप अधोरेखित झाले. 'एअर इंडिया'चे एक विमान धावपट्टीवरून घसरले आणि टेकडीवरून पडल्यानंतर आग लागली. या धावपट्टीच्या आकारामुळे आणि आजूबाजूच्या भूप्रदेशामुळे 'टेक ऑफ' आणि 'लँडिंग' करणे अत्यंत धोकादायक आहे. भारतातील या धोकादायक विमानतळांवर फक्त अनुभवी वैमानिकांनाच उड्डाण करण्याची परवानगी दिली जाते. यासाठी वैमानिकांना विविध चाचण्या पार कराव्या लागतात. प्रशिक्षणार्थी वैमानिकांना येथे चुकूनही पाठवले जात नाही.



# वराने दुसरीच्या गळ्यात घातली माळ आणि पुढे...

लग्न म्हटले की आयुष्याचा नव्याने सुरू होणारा प्रवास असतो. या प्रवासात आपला जोडीदार योग्य असला तर तो सुखाने होते; पण ही निवड चुकली, तर आयुष्यभर पश्चाताप करण्याशिवाय काही पर्याय नसतो. सुदैवाने काहीजणांना लग्नाच्या आधीच जोडीदाराबद्दल ही कल्पना येते किंवा माहिती मिळते, तर काहींना दुर्दैवाने लग्नानंतरच हे गुपित कळते. उत्तर प्रदेशमधील बरेलीमध्ये याची प्रचिती देणारी एक घटना समोर आली आहे. प्रकरण इथपर्यंत पोहोचले, की नवरी मुलीने नवऱ्याच्या कानाखाली लगावत लग्न मोडले. उत्तर प्रदेशमधील बरेली येथे लग्नमंडपात नवरा मुलगा दारुच्या नशेत पोहोचला होता. या वेळी त्याने दारूच्या नशेत नवरी मुलीच्या मैत्रिणीच्या गळ्यात हार घातला. यानंतर संतापलेल्या २१ वर्षीय नवरीने, राधा देवीने मुलाच्या कानाखाली लगावली आणि लग्न मोडून मंडपातून निघून गेली; पण लग्नमंडपात फक्त एवढंच झालं नाही.

**हुंड्याचीही मागणी**

२६ वर्षीय नवरा मुलगा रवींद्र कुमार वरात घेऊन लग्नमंडपात उशिरा पोहोचला आणि तिथून सगळे काही सुरू झाले. नवरी मुलीच्या कुटुंबाने फिर्यादीत दिलेल्या माहितीनुसार नवऱ्या मुलाच्या कुटुंबाने अतिरिक्त हुंड्याची मागणी केली होती. मुलीच्या वडिलांनी सांगितले की आपण लग्नाआधीच्या विधींदरम्यान २.५ लाख रुपये दिले होते. यानंतर लग्नाच्या सकाळी दोन लाख दिले; पण यावरही नवऱ्या मुलाच्या कुटुंबाचे पोट भरत नव्हते.

**वरमाला घालण्याच्या वेळी मद्यपान**

रवींद्रकुमारला आपल्या मर्जीतील मुलीशी लग्न करायचे होते. तो आपल्या लग्नात दारुच्या नशेत पोहोचला आणि मुलीचे कुटुंब, नातेवाइकांशी गैरवर्तन करू लागला.

वरमाला घालण्याची वेळ आली, तेव्हा तो आपल्या मित्रांसह मद्यपान करत होता. वरमाला घालताना रवींद्रकुमारने चुकून नवरी मुलीच्या शेजारी उभ्या असलेल्या तिच्या मैत्रिणीच्या गळ्यात हार घातला. यामुळे नवरी मुलगी इतकी संतापली की तिने त्याच्या कानाखाली लावली आणि लग्न मोडून निघून गेली.

**मंगल कार्यालयात खुर्च्यांची फेकाफेक**

प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही. यानंतर नवरा मुलगा आणि नवरी मुलीच्या कुटुंबीयांमध्ये हाणामारी सुरू झाली. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर खुर्च्या फेकण्यात आल्या. नवरा मुलगा आणि वरातीला पुन्हा माघारी पाठवण्यात आले. पोलिसांनी नवरा मुलगा आणि त्याच्या मित्रांविरोधात नवरी मुलीच्या कुटुंबाचा अपमान केल्याबद्दल आणि शांतताभंग केल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे. हुंडा मागितल्याप्रकरणी नवऱ्या मुलाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मित्रांनीच नवऱ्या मुलाला दारू पाजली असे सांगितले जात आहे.



# पाण्याखालचं मिलिट्री संग्रहालय

सैन्याचे रणगाडे, तोफा, बंदुका अशा वस्तू समुद्राच्या तळाशी पहायला मिळाल्या तर... खूप गंमत येईल ना? जॉर्डनमध्ये असंच एक संग्रहालय तयार करण्यात आलं आहे. या संग्रहालयात सैन्याचे रणगाडे, हेलिकॉप्टर, बंदुका, बोटी पहायला मिळतात. विशेष म्हणजे हे संग्रहालय समुद्राच्या तळाशी आहे. त्यात तुम्हाला सैन्याची १९ उपकरणं पहायला मिळतील. अकाबा किनाऱ्यावरून हे संग्रहालय पहायला जाता येईल. लाल समुद्रात २८ मीटर म्हणजे ९२ फूट खोल ते उभारण्यात आलं आहे. फक्त सात दिवसात ते उभारण्यात आलं. इथे येणाऱ्या पर्यटकांना काही तरी धाडसी, वेगळं पाहिल्याचं समाधान मिळावं, समुद्री जीवनासोबतच सैन्याचं वैभव न्याहाळता यावं या उद्देशाने हे संग्रहालय उभारण्यात आलं. हे जगातलं पाण्याखालचं पहिलं मिलिट्री संग्रहालय आहे. पर्यटकांना तिथेपर्यंत पोहोचवण्यासाठी खास बोटी तयार करण्यात आल्या आहेत. खोल पाण्यात जायचं नसेल तर पर्यटक वरूनच हा नजारा बघू शकतात. यासाठी काचेच्या बोटी तयार आहेत. या बोटींमधून समुद्र तळ न्याहाळता येईल. असं हे अनोखं संग्रहालय जॉर्डनची शान वाढवणारं आहे.

# जुने ते सोने



सर्वसाधारणपणे कोणी जुने बूट खरेदी करत नाही. असे बूट, पादत्राणं टाकून दिली जातात. मात्र पादत्राणं तयार करणाऱ्या एका प्रसिद्ध कंपनीचे ४७ वर्षांपूर्वीचे बूट कोट्यवधी रुपयांना विकले गेले आहेत. या बुटांचा लिलाव करण्यात आला त्यावेळी भारतीय चलनात तीन कोटी रुपये एवढी किंमत मिळाली. काही काळापूर्वी 'नायके' या कंपनीची सर्वात दुर्मीळ बुटांची जोडी तीन कोटी रुपयांना विकली गेली. तेव्हा हा लिलाव चर्चेचा विषय ठरला होता. असं काय होतं या बुटांमध्ये, असा प्रश्न तुमच्या मनात उपस्थित झाला असेल. आजवर जुन्या बुटांना कधीच एवढी किंमत मिळाली नव्हती. याआधी महान बास्केटबॉलपटू मायकल जॉर्डनच्या बुटांवर १.३ कोटी रुपयांची बोली लागली होती. त्यानंतर नायके कंपनीच्या या बुटांसाठी एवढी बोली लावली गेली. हे बूट कंपनीने ४७ वर्षांपूर्वी तयार केले होते. ऑलिंपिक चाचणीच्या उद्देशाने त्यांची निर्मिती करण्यात आली होती. 'मून शूज' या नावाने ते ओळखले जायचे. न्यूयॉर्कमधल्या सोदबी ऑक्शन हाऊसमध्ये हा लिलाव संपन्न झाल्याचे आजही अनेकांना आठवत असेल. झाला. बिल बॉवर्नमॅन यांनी हे बूट डिझाइन केले होते. या लिलावात बुटांच्या १०० जोड्यांसाठी भारतीय चलनात ५.५६ कोटी रुपयांची बोली लागली होती.

# अनोखा संवाद



प्राणी-पक्षी एकमेकांशी संवाद साधतात. धोक्याच्या सूचना देतात. एकमेकांच्या मदतीसाठी धावूनही येतात. पण त्यांच्या अंड्यांचं काय? अंडीही एकमेकांशी संवाद साधतात का? या प्रश्नाचं उत्तर 'हो' असं द्यावं लागेल. अंडीही एकमेकांशी संवाद साधतात. स्पेनमधल्या विगो विद्यापीठातल्या एका संशोधनातून ही धक्कादायक बाब समोर आली. संशोधकांनी पिवळ्या पायांच्या चिमणीच्या ९० अंड्यांवर संशोधन केलं. त्यावेळी आईने धोक्याची सूचना दिल्यावर अंड्यांमध्ये कंपनं जाणवली. या कंपनांद्वारे अंडी इतर अंड्यांना सावध करतात. कंपनांमुळे शेजारचं अंडं सावध होतं. त्याला धोक्याची जाणीव होते. अंड्यांच्या आत असणारी पिल्लं धोक्याची सूचना मिळताच तीव्र हालचाली करू लागतात, आवाज काढू लागतात. या आवाजामुळे अंड्यांमध्ये कंपनं जाणवतात. कंपनांच्या माध्यमातून अंडी एकमेकांशी संवाद साधतात. या सूक्ष्म निरीक्षणावरून पक्ष्यांची अंडी एकमेकांशी संवाद साधत असल्याची बाब अधोरेखित होत असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

# न्यू आर्टस्‌मधील बी.एस्सी.डेटा सायन्सच्या विद्यार्थ्यांना अमेरिकेच्या 'सेपिया इनोव्हेशन' कंपनीत इंटरशिपची संधी

नगर – न्यू आर्टस्‌ सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, अहमदनगर येथील बी.एस्सी. डेटा सायन्सच्या पहिल्या बॅचमधील अंतिम वर्षातील २६ विद्यार्थ्यांना अमेरिका स्थित सेपिया इनोव्हेशन कंपनीमार्फत इंटरशिपची संधी प्राप्त झाली आहे. इंटरशिप ऑफर लेटर वितरणाचा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्या हस्ते पार पडला.



न्यू आर्टस्‌ सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, अहमदनगर येथील बी.एस्सी. डेटा सायन्सच्या पहिल्या बॅचमधील अंतिम वर्षातील २६ विद्यार्थ्यांना अमेरिकेच्या कंपनीत इंटरशिपची संधी प्राप्त झाली आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना आर्टिफिशियल इंटेलिजेंस आणि क्लाउड कंप्यूटिंग या क्षेत्रातील वाढत्या रोजगार संधींबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान क्षेत्रातील सतत बदलत्या गरजांशी सुसंगत राहण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की आजचा दिवस तुमच्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. अमेरिकेतील सेपिया इनोव्हेशनसारख्या कंपनीत इंटर्नशिपची संधी मिळणं, ही केवळ एक सुरुवात आहे – तुमच्या मेहनतीची आणि चिकाटीची पहिली पावती आहे. डेटा सायन्स, आर्टिफिशियल इंटेलिजेंस, आणि क्लाउड कम्प्युटिंग ही क्षेत्रं केवळ भविष्यातील नाहीत, तर वर्तमानाचीही गरज बनली आहेत. या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही – सतत नवनवीन गोष्टी शिकण्याची जिज्ञासा, स्वअनुशासन आणि कठोर परिश्रम यांची नितांत आवश्यकता आहे. जगभरातील कंपन्या आज अशा तरुणांची शोधात आहेत, जे केवळ टेक्निकल कौशल्यात निपुण नसतात, तर जे समस्या सोडवण्याची क्षमता, टीममध्ये काम करण्याची तयारी आणि संवाद कौशल्य या गोष्टींमध्येही सक्षम असतात.

निवड झालेल्या विद्यार्थांना विशेष मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, – इंटरशिप ही एक सुवर्णसंधी आहे, पण त्याचा खरा फायदा तुम्ही कशाप्रकारे घेता, यावर तुमचं भवितव्य ठरणार आहे. फक्त काम करणे नव्हे, तर प्रत्येक टास्कमधून शिकण्याची वृत्ती ठेवा. प्रोजेक्ट्समध्ये तुमचं योगदान दिलं जातंय का यावर लक्ष ठेवा. कधीही हे माझं काम नाही असं म्हणू नका. संधी कुठूनही येऊ शकते. आणखी एक गोष्ट – आज तुम्हाला मिळालेली ही संधी म्हणजे तुमच्या गावाकडील किंवा कुटुंबातील लहान भावंडांसाठी एक प्रेरणा आहे. त्यामुळे तुमचा प्रत्येक प्रयत्न केवळ तुमच्यासाठी नसून, समाजासाठीही आहे. आताची मेहनत, पुढच्या काही वर्षांचा संघर्ष तुम्हाला एक वेगळी ओळख देईल. स्वप्न मोठी बघा, पण त्यासाठी मेहनत ही अजून मोठी ठेवा.

याप्रसंगी डेटा सायन्स विभागप्रमुख प्रा. अरुण गांगर्डे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बी.एस्सी. डेटा सायन्स या पदवी अभ्यासक्रमाच्या सुरुवातीपासून ते आतापर्यंतच्या तीन वर्षांच्या शैक्षणिक प्रवासाविषयी माहिती दिली.

प्रा. अरुण गांगर्डे यांनी सांगितले की, डेटा सायन्स हा अभ्यासक्रम न्यू आर्टस्‌ कॉलेजमध्ये सुरु करताना आमचे उद्दिष्ट हे केवळ एक नवीन कोर्स सुरू करणे नव्हते, तर विद्यार्थ्यांना उद्योगजगतातील सध्याच्या आणि भविष्यातील गरजांसाठी तयार करणे हे होते. तीन वर्षांपूर्वी सुरु झालेला हा अभ्यासक्रम, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक क्रांतिकारी पाऊल ठरला आहे.

ते पुढे म्हणाले, या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना आर्टिफीशीअल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, क्लाऊड यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानांचे सखोल प्रशिक्षण दिले गेले आहे. फक्त शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर प्रोजेक्ट्स, टीमवर्क, इंडस्ट्री कोलेबरेशन्स आणि नियमित प्रॅक्टिकल्स यांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला. आज सेपिया इनोव्हेशन सारख्या आंतरराष्ट्रीय कंपनीकडून २६ विद्यार्थ्यांना मिळालेली इंटर्नशिप ही फक्त एक उपलब्धी नाही, तर या कोर्सच्या दर्जाची आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीची साक्ष आहे.

ते म्हणाले, या कोर्सची संकल्पना प्रत्यक्षात उतरवताना अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त आणि कार्यकारी मंडळ या सर्वांचे मार्गदर्शन आणि प्राचार्य डॉ. भास्कर झावरे, प्राचार्य डॉ. सागडे यांचे नेतृत्व, कॉलेज प्रशासनाचे सहकार्य आणि पालकांचा विश्वास हे आमच्यासाठी प्रेरणास्त्रोत ठरले.

या संधीसाठी गर्जे मराठी ग्लोबॉल फाउंडेशन अमेरिका आणि आनंद गाणू तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठाचे प्रोफेसर अजित जावकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सहकार्यामुळेच विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. अनंता हरकाळ, प्रा. पी. यु. पाटील, प्रा. डि. व्हि. जगदाळे, प्रा. मनोहर गोबरे, प्रा. अमित ताकटे तसेच अन्य प्राध्यापक यांची उपस्थिती कार्यक्रमात लाभली.

## न्यू आर्टस्‌ कॉलेजमध्ये १४ मे रोजी कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्टस्‌ कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयात १४ मे रोजी 'कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमात विविध कंपन्या महाविद्यालयात येऊन थेट मुलाखती घेणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणादरम्यानच नोकरीची संधी मिळणार आहे, जी त्यांच्या भविष्यासाठी खूपच उपयुक्त ठरणार आहे. हा कार्यक्रम ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेलच्या पुढाकाराने होणार असून सकाळी १० वाजता सुरू होईल. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये Emcure Pharmaceuticals Ltd., EATON Ltd., GKN Fokkers Ltd., Enzine Biosciences Ltd., Amphenol India Ltd. तसेच काही इतर कंपन्या सहभागी होणार आहेत.

या प्लेसमेंट ड्राईव्हसाठी B.Sc., B.Com. आणि B.A. च्या अंतिम वर्षातील विद्यार्थी पात्र आहेत. हे विद्यार्थी याचा फायदा घेऊन थेट नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवडले जाऊ शकतात.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी सांगितले की, आमच्या महाविद्यालयात शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळाव्यात, यासाठी आम्ही दरवर्षी प्लेसमेंट ड्राईव्ह घेत असतो. यावर्षी सुद्धा सहा कंपन्याचे कॅम्पस इंटरव्ह्यु पूर्ण झाले असून, ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. आम्ही विद्यार्थ्यांना फक्त शिक्षण देत नाही, तर त्यांना आत्मनिर्भर बनवतो.

ते पुढे म्हणाले की महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. शिक्षण, प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, आणि नोकरीची संधी – हे सगळं एका ठिकाणी मिळवून देण्याचे काम हे महाविद्यालय करत आहे.

या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेल मार्फत केले असून सेलचे समन्वयक प्रा. आशिष वाणी यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांकडून मुलाखतीची तयारी करून घेणे, कंपन्यांशी संपर्क साधणे आणि प्लेसमेंट ड्राईव्ह यशस्वी करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याला रोजगराची चांगली संधी मिळावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

या प्लेसमेंट ड्राईव्हमुळे विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट जगतात प्रवेश करण्याची पहिली संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा पुरेपूर फायदा घ्यावा, असे आवाहन महाविद्यालय प्रशासनाने केले आहे.

## घरात घुसून महिलेच्या गळ्यातील दागिने पळविले

नगर – घरात घुसून घरामध्ये एकटी असलेल्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण व सोन्याच्या मण्याची पोत असा २ लाख ७५ हजार रुपये किंमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने ओरबडून चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील आगडगाव येथील टोकेवाडी येथे ९ मे रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत विकास तुळशीराम कराळे (वय ५२, रा. टोकेवाडी, आगडगाव, ता. नगर, हल्ली रा. त्रिमूर्ती चौक, सारसनगर, अ.नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे की त्यांच्या मूळ गावी आगडगाव परिसरातील टोकेवाडी येथे फिर्यादीची आई कमल तुळशीराम कराळे या घरी एकट्या असताना रात्री ८ वाजल्याच्या सुमारास एक २० ते २५ वयाचा, अंगात काळ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातलेला व तोंडाला काळ्या रंगाचा मास्क लावलेला अनोळखी तरुण घरात घुसला.

त्याने घरात एकट्या असलेल्या कमल कराळे यांच्या गळ्यातील ४ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण व एक सोन्याची पोत असा ऐवज बळजबरीने हिसकावून नेला. या घटनेनंतर त्यांनी आरडाओरडा केल्यावर परिसरातील नागरिक जमा झाले. त्यांनी फिर्यादी विकास कराळे यांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर कराळे हे तातडीने गावी गेले. त्यांनी माहिती घेवून नगर तालुका पोलिस ठाण्यात येवून रात्री उशिरा फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बी एन एस २०2३ चे कलम ३०९ (४) प्रमाणे जबरी चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे हे करीत आहेत.



## आजिनाथ खेडकर यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगर येथे कार्यरत उपअभियंता अजिनाथ खेडकर यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. यात प्रसंगी होले, अभियंता हर्षल काकडे, किरण कदम, उपअभियंता अजीनाथ खेडकर, पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात, वरिष्ठ लिपिक श्रीमती सप्तर्षी आदींसह कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## ९३.८३ टक्के गुण मिळवून बारावी वाणिज्य शाखेत 'सारडा'मध्ये ओम चोरबेले प्रथम

नगर – पेमराज सारडा कॉलेजचा बारावी वाणिज्य शाखेतील विद्यार्थी ओम चोरबेले हा ९३.८३% गुण मिळवुन महाविद्यालयात प्रथम आला. तसेच तो इंग्लिश व अकाउंट्स मध्ये सुध्दा प्रथम आला आहे. त्यास एफ सी ए ॲकॅडमीचे पवन दरक, शबनम मॅडम व महाविद्यालयाचे थोरात सर व होले सर यांचे मार्गदर्शन लाभले. याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. ओम हा अ.नगर येथील कर सल्लागार निलेश चोरबेले यांचा मुलगा असुन सुपा येथील व्यापारी सुभाषलाल चोरबेले यांचा तो नातु आहे.



## निमगाव वाघा येथे मोफत नेत्र तपासणी शिबिरास प्रतिसाद

### छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आरोग्यसेवेचा उपक्रम

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरास ग्रामस्थांचा प्रतिसाद लाभला. ग्रामीण भागातील दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींना नवदृष्टी देण्याच्या उद्देशाने स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि वैष्णवी ऑप्टीकल्स यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरास ग्रामस्थांचा प्रतिसाद लाभला.

शिबिराचे उद्‌घाटन ग्रामपंचायत सदस्य व डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते झाले. यावेळी लक्ष्मण चौरे, रामदास पवार, नवनाथ हारदे, डॉ. वैष्णवी जरबंडी, डॉ. आकाश जरबंडी, डॉ. ओमकेश कोंडा, नवनाथ कृपा महिला ग्रामसंघ (सीआरपी) सोनाली फलके, मंगल ठाणगे, अनिल आनंदकर, रामचंद्र फलके, युवा मंडळाचे अध्यक्ष संदीप डोंगरे, नवनाथ हारदे, जयवंत जाधव आदी उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, सध्या आरोग्य सेवा महाग झालेली असताना सामान्य जनतेला तिचा लाभ घेणे कठीण झाले आहे. ग्रामीण भागातील ज्येष्ठ ग्रामस्थांना डोळ्यांच्या समस्या अधिक भेडसावतात. अशा शिबिरातून गरजूंना आधार मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. वैष्णवी जरबंडी यांनी सेवाभावाने ग्रामीण भागात आरोग्यसेवा देण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामधील दृष्टीदोष असलेल्या अनेक नागरिकांवर अल्पदरात विविध शस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याची त्यांनी माहिती दिली.

गावातील श्री संत सावता महाराज मंदिराच्या सभामंडपात शिबिर पार पडले. या शिबिरात अद्ययावत संगणकीय उपकरणांद्वारे १२५ ग्रामस्थांची नेत्र तपासणी करण्यात आली. गरजू नागरिकांना अल्प दरात नंबरचे चष्मे वाटप करण्यात आले. तसेच मोतीबिंदू व काचबिंदूसारख्या डोळ्यांच्या आजारांसाठी अल्पदरात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

## अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन अहिल्यानगरमध्ये करण्यात आले आहे. या महोत्सवा अंतर्गत राज्यस्तरीय वत्कृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा प्रार्थमिक व अंतिम अशा फेऱ्यांमध्ये होणार आहे, अशी माहिती संयोजन समितीचे विशारद पेटकर यांनी दिली.




ही स्पर्धा महाविद्यालयीन विधार्थी व १८ वर्षांपुढील स्पर्धाकांसाठी खुली आहे. या स्पर्धे साठी स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सबलीकरणाचे प्रतीक व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रतीक हे विषय देण्यात आहेत.

स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी स्पर्धकांनी स्पर्धेच्या विषयांपैकी निवडलेल्या विषयावर जास्तीत जास्त पाच मिनिटे स्वतःचा भाषण करतानाचा व्हिडिओ तयार करून संयोजकांकडे १६ मे पर्यंत पाठवायचा आहे. त्याचे परीक्षण होऊन प्राथमिक फेरीतून निवडलेल्या वीस स्पर्धकांची २३ मे रोजी होणाऱ्या अंतिम फेरीसाठी निवड केली जाणार आहे. स्पर्धेची अंतिम फेरी न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये सकाळी १० ते ५ या वेळेत होणार आहे.

या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम १० हजार, द्वितीय ७ हजर, तृतीय ५ हजार व उत्तेजनार्थ २००० व १००० रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत, अशी माहिती स्पर्धेचे संयोजक ऐश्वर्या सागडे यांनी दिली.

अधिक माहितीसाठी ९२२५३०२०३८ व ८०८०७२८५३२

## कंपनीच्या गेटसमोरून मोटारसायकलची चोरी

नगर – एमआयडीसी येथील एक्साइड कंपनीतील इंजिनीयर ऋषिकेश पाठक यांची खंडू भाऊसिंग बागुल यांचे नावावर असलेली हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. एम एच १२ सी इ ८७२५) कंपनीच्या गेटसमोर पार्क करुन लावलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना ७ मे रोजी सकाळी ९.३० ते रात्री ९.१५ या कालावधीत घडली.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात हेमराज अहिरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला. अधिक तपास पोलीस नाईक पालवे करीत आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# 'शंखनाद महोत्सव' एक हजार वर्षांपूर्वीच्या सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे होणार दुर्मिळ दर्शन

### २३ देशांतील लोकसहभाग; शंखनाद महोत्सव; हा आध्यात्मिक पर्यटनाचा नवा अध्याय! – सनातन संस्था

पणजी (गोवा) – १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत सनातन संस्थेच्या वतीने फर्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर होणारा 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' हा केवळ धार्मिक नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील आध्यात्मिक जागृतीचा महोत्सव ठरणार आहे. २३ देशांतील प्रतिष्ठित मान्यवर, विविध संप्रदायांचे संत–महंत, मंदिरांचे विश्वस्त आणि २५ हजारांहून अधिक साधक, भाविक यांचा सहभाग अन् यज्ञयागामुळे हा महोत्सव काशी, उज्जैन, अयोध्येप्रमाणे आध्यात्मिक पर्यटनाचा नवा अध्याय असणार आहे, त्यामुळे विकासालाही गती मिळणार आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते चेतन राजहंस यांनी आज पणजी येथील पत्रकार परिषदेत दिली.






पणजी येथील 'हॉटेल मनोशांती'मध्ये आयोजित पत्रकार परिषदेला आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री. संतोष घोडगे, सांस्कृतिक न्यासाचे जयंत मिरिंगकर, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे नितीन फळदेसाई, कुंडई तपोभूमी येथील पद्मनाभ संप्रदायाचे सुजन नाईक, ब्राह्मण महासंघाचे राज शर्मा, जगद्गुरु स्वामी नरेंद्राचार्य महाराजांचे अनुयायी अनिल नाईक, गोमंतक मंदिर महासंघाचे जयेश थळी आणि हिंदु जनजागृती समितीचे युवराज गावकर उपस्थित होते.

'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त १ हजार वर्षांपूर्वीच्या सोरटी सोमनाथ जोतिर्लिंगाचे दर्शन घेण्याची दुर्मिळ संधी सर्वांना मिळणार आहे. हे शिवलिंग मूर्तीभंजक गझनी याने तोडले होते आणि नंतर त्याचा पुढे अग्निहोत्र संप्रदायाच्या साधकांनी सांभाळ केला. आता 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या आशीर्वादाने आता हे शिवलिंग महोत्सवाच्या ठिकाणी १७ ते १९ मे या कालावधीत लोकांच्या दर्शनासाठी ठेवले जाणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळतील शस्त्रात्रांचे प्रदर्शनही लावण्यात येणार आहे.

काशी विश्वनाथ कॉरिडॉर आणि अयोध्येतील श्रीराम मंदिरामुळे उत्तर प्रदेशला दरवर्षी सुमारे २२ हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे पर्यटन क्षेत्रात ७ व्या क्रमांकावर असलेले उत्तर प्रदेश आता अग्रस्थानावर पोहोचले आहे. यावरून केवळ आध्यात्मिक पर्यटनामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा चालना कसा मिळू शकतो, हे स्पष्ट होते. पूर्वी 'दक्षिण काशी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोव्यालाही असा लाभ निश्चितच मिळू शकतो. मंदिरे किंवा धार्मिक कार्यांना अंधश्रद्धा समजणाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, मंदिरे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचा आत्मा आणि कणा आहेत. आज जागतिक स्तरावरील औद्योगिक शहरे लयाला जात असताना, उज्जैन, तिरुपती, रामेश्वरम्, काशी यांसारखी तीर्थक्षेत्रे असलेली शहरे हजारो वर्षांपासून टिकून आहेत, तसाच त्यांच्या परिसराचाही विकास झाला आहे.

**शंखनाद महोत्सवामुळे पर्यटनात वाढ :** या तीन दिवसीय महोत्सवासाठी देशविदेशातून २५ हजारांहून अधिक भाविक, साधक, प्रतिष्ठित लोक गोव्यात दाखल होणार आहेत. हे सर्वजण येथे ३ ते ५ दिवस निवास करतील, प्रवास करतील, स्थानिक वाहने वापरतील, मंदिरांना भेट देतील, हॉटेल, बाजार, रेस्टॉरंट्स, पर्यटन स्थळे यांचा लाभ घेतील. यामुळे सर्व स्थानिक व्यवसाय आणि रोजगार यांना चालना मिळेल. या सर्व प्रक्रियेतून जो जीएसटी, तसेच सेवा कर भरला जाईल त्यामधून राज्य सरकारलाही मोठे उत्पन्न मिळणार आहे.

**हा महोत्सव उज्ज्वल अध्यात्मिक भविष्यासाठीचा शंखनाद :** अन्य व्यवसायाच्या तुलनेत आध्यात्मिक पर्यटन हे एक सुरक्षित आणि शाश्वत विकासासोबतच समाजातील नैतिक मूल्यांची पुनर्स्थापना करणारे आहे. या महोत्सवामार्फत मंदिर परंपरा, लोककला, सांस्कृतिक ओळख, तसेच साधना, आध्यात्मिक विचारधारा आणि राष्ट्रनिष्ठ मूल्यांचा जागर करण्यात येणार आहे. एकूणच 'शंखनाद महोत्सव' हा उज्ज्वल आध्यात्मिक भविष्यासाठीचा शंखनाद आहे. या महोत्सवाविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी SanatanRashtraShankhnad.in या संकेतस्थळाला भेट द्या.

# करिअर मार्गदर्शन



१० वी नंतर काय?
आर्टस्, कॉमर्स किंवा सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी योग्य व उपयुक्त फ्री सेमिनार अवश्य फायदा घ्या..
श्रीमती श्रद्धा गांधी (+ करिअर कॉंसलर)
श्री.ऋषिकेश सर (आयआयटी, मुंबई)
सेमिनार : रविवार दि.११ मे २०२५, वेळ : संध्या-५ ते ७
पत्ता : प्रेम कॉर्नर, दुसरा मजला, भिस्तबाग चौकाजवळ, श्रमिकनगर, बालाजी कमान, अहिल्यानगर
8793009661, 8446279661

## दीप गाई पावर सिस्टम

सर्व कंपनीचे इन्व्हर्टर व बॅटरी रिपेअर करुन मिळेल.
बॅटरी वॉटर टाकून मिळेल.
घरपोहोच सेवा
जुने इन्व्हर्टर बॅटरी विकत घेतो व विकतो
9260000613

## DR. VITHALRAO VIKHE PATIL FOUNDATION

Vadgaon Gupta (Vilad Ghat), Po. M.I.D.C., Ahilyanagar - 414111.(M.S.)
Phone : (0241) 2778042, 2779895 Fax -(0241)2778043
Email : vikhef@rediffmail.com | Website : pdvvpfa.org

**WANTED**

Applications from eligible candidates are invited for the following posts :-

| Sr. No. | Post(s) | Qualification | Experience |
|---|---|---|---|
| 1. | Lab. Technician | Degree / Diploma in Engineering | 5 years |
| 2. | Sr.Clerk / Head Clerk | Any Graduate with English & Marathi Typing. Computer knowledge is essential. | 10 Yrs & above. |
| 3. | Clerk cum Typist | Any Graduate with English & Marathi Typing. | 2 To 5 years |

- For Sr no 2 & 3:- Preference shall be given to candidates with experience in professional academic institutions.
- Salary:- Negotiable.

Apply with relevant testimonials including experience to undersigned through E-mail (vikhef@rediffmail.com) / on the above address within 7 (seven) days from the date of publishing of this advertisement.

**Secretary General (Offg.)**

## मुले पहिजेत

मार्केटयार्ड येथील होलसेल कॉस्मेटीक्स दुकानासाठी
पुर्ण वेळ मुले पाहिजेत
(जागा ४)
शिक्षण-१० वी पास
9623685787

## हेल्पर त्वरित पाहिजेत

(भरपूर पगार)
कॉटेज कॉर्नर येथील फर्निचर शोरुमसाठी हेल्पर पाहिजेत
३ जागा
- समक्ष भेटा -
स्टेबल वर्ल्ड फर्नीचर
कॉटेज कॉर्नर,राजपाल स्टोअर्स शेजारी नगर-मनमाड रोड, सावेडी, अ.नगर
8149830004

## अकौटंट पाहिजे

कॉटेज कॉर्नर येथील फर्निचर शोरुमसाठी अनुभवी अकौंटट त्वरित पाहिजे.
(टॅलीचे ज्ञान आवश्यक, आकर्षक पगार)
- समक्ष भेटा -
स्टेबल वर्ल्ड फर्नीचर
कॉटेज कॉर्नर,राजपाल स्टोअर्स शेजारी नगर-मनमाड रोड, सावेडी, अ.नगर
7222043222

## १५ वे पुण्यस्मरण...



स्नेहाचे बंधन गेले..
ममतेची गेली सावली..
करूणेचा हरवला सागर..
परिवाराचे हास्य लोपले...
आठवणीने आपल्या
आजही आमचे नेत्र ओले..

आपल्या पुण्यस्मरणदिनी भावपूर्ण पुष्पांजली
स्व. श्रीमती चंद्रभागाबाई फुलचंदजी वर्मा
स्व.दि. ११ मे २०१०

नंदकिशोर वर्मा शिवनारायण वर्मा जगदीश वर्मा
रवि वर्मा रुपेश वर्मा योगेश वर्मा चिराग वर्मा प्रत्युष वर्मा
वर्मा परिवार अहमदनगर
फर्म - शिवनारायण दलिचंद वर्मा
सराफ बाजार, भाजी मार्केट, अहमदनगर



महेंद्र पेढावाला
# रजवाडी गुजराती थाळी



दर रविवारी दालबाटी व चुरमा
व दररोज आमरसचा बेत
हापुस आमरस
400/- किलो
ट्रेन पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टी सुविधा उपलब्ध.
कापड बाजार, अहिल्यानगर.

## – पाहिजेत –

बिलिंग एक्झिक्युटिव्ह - २
१२वी पास/पदवीधर,
फक्त विवाहित महिला, संगणकाचे ज्ञान
कामाची वेळ : सकाळी ९.३० ते सायं. ७.००
- आकर्षक पगार | समक्ष भेटा -
के. प्रकाश अँण्ड कंपनी (गांधी)
मुंजोबा स्वीटस् शेजारी, मार्केटयार्ड रोड, अहिल्यानगर. मो. 9665511179

## अहिल्यानगरमधील नामांकित प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये खालील जागा त्वरित भरणे आहे.

- आर.एम.ओ.BAMS/BHMS – ०५ पदे
- स्टाफ नर्स GNM/ANM – १५ पदे
- मावशी/मामा –२५ पदे (शिक्षण ७ वी पास असावे)
- महिला /पुरुष सफाई कर्मचारी–१० पदे

वरील सर्व पदासाठी अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल
संपर्क - 7715882777, 8446544259, 9370247009

* दिनांक – 08 मे ते 15 मे 2025
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

| | |
|---|---|
| MAJHI PRARTHANA 07:15 PM | BHOOL CHUK MAAF 08:30 AM I 10:00 AM 12:30 PM I 03:00 PM 05:30 PM I 08:00 PM 10:30 PM |
| GULKAND 04:30 PM | ATA THAMBAYCHA NAAY 01:45 PM |
| RAID 2 09:15 AM 12:00 PM I 02:40 PM 05:20 PM I 08:00 PM 10:00 PM I 10:40 PM | PSI ARJUN 1100P M |

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

## मनाप्रमाणे कमवा

बंधू आणि भगिनींनो...
रिकामा वेळ वाया घालवू नका
सोप्पं काम आणि भरपूर प्राप्ती
मनाप्रमाणे काम करा
वेळेचं बंधन नाही
कोणीही Boss नाही
वाटेल तेवढं कमवा
एक फोन तुमचं जीवन बदलून टाकेल.
आत्ताच फोन करा
Mo. 9226008910



भारतातील एकमेव महाराष्ट्रीयन सर्कस
अहिल्यानगरीत प्रथमच
सर्वांनी पहावी अशी अफलातून
सुपरस्टार सर्कस
विशेष आकर्षण चिपांझीसारखा माणूस
SUPERSTAR CIRCUS
7201090526
9860349934
रोज - 3 शो : दु. 4, 6, रात्री 8.30 वा. तिकीट दर 400/-, 300/-, 200/- व 100/-
पांजरपोळ मैदान, मुंजोबा स्वीटस् मागे, मार्केट यार्ड चौक, अहिल्यानगर

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 08 MAY - 15 MAY 2025



| | | |
|---|---|---|
| रेड २ 10:00 AM I 12:30 PM 09:00 AM I 11:15 PM 05:15 PM I 08:00 PM 10:45 PM I 02:00 PM | गुलकंद 06:00 PM I 08:45 PM | हिट: थर्ड केस 03:15 PM I 07:30 PM 10:30 PM |
| पी.एस.आय. अर्जुन 11:45 AM | केसरी २ 11:30 AM | आता थांबायचं नाय 04:45 PM |

टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow
नगर कॉलेज जवळ, जुडिओच्या वरती, अ.नगर
9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX

# आपण आजारी नसतानाही



हात-पाय गळून जाणे.
अंग दुखणे, पाठ दुखणे.
कंबर दुखणे, थकवा येणे.
कामाचा उत्साह नसणे.
अशक्तपणा वाटणे.

सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

डॉ.सौ. उर्मिला गिते
या सर्व तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह
बालिकाश्रम रोड, अ.नगर.
मो. 9422740888

## कामगार पाहिजेत

कापड दुकानात कामासाठी अनुभवी जेन्टस्/लेडीज कामगार पाहिजेत.
शिंगी एन्टरप्रायजेस
खिस्त कारंजा, अहिल्यानगर
9993061616

## १ वर्षाच्या बाळाला सांभाळण्यासाठी बाई/मुलगी पाहिजे

सारसनगर येथे सावी हॉस्पिटलजवळ
(वय १८ ते ४५)
वेळ : सकाळी ९ ते संध्या. ९
8888576576

## जनसेवा ट्रान्सपोर्ट सर्व्हिस

अहमदनगर ते पुणे,पिंपरी, पनवेल, वाशी, मुंबई, कल्याण, भिवंडी, ठाणे, उल्हासनगर डोअर डिलेव्हरी डेली सर्व्हिस

मुंबई, भिवंडी, अंधेरी, पुणे, फुरसुंगी, वाघोली ते अहमदनगर,राहुरी, श्रीरामपूर, संगमनेर, कोपरगाव, पाथर्डी, शेवगाव, तिसगाव, नेवासा, सोनई, वांबोरी, लोणी व संपूर्ण अहमदनगर जिल्हा

अहमदनगर बुकिंग ऑफिसेस
- अहमदनगर सिटी : १२१५, जे.जे.गल्ली, मंगलगेट, अहमदनगर, मो : 9822668866/9028501060
- एमआयडीसी : पी ३६, चाकण ऑईल मिलजवळ, एमआयडीसी, अहमदनगर, मो : 9271685447



# राजासारखं मन मनासारखा राजा

काका आपल्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन

* दशक्रिया विधी *
रविवार दि.११ मे रोजी सकाळी ७.०० वाजता
* स्थळ : अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर

* शोकाकुल *
दादासाहेब हरिभाऊ पाखरे (सर)
संतोष दादासाहेब पाखरे
ॲड. संदीप दादासाहेब पाखरे
नोटरी पब्लिक भारत सरकार
मा. चेअरमन अहमदनगर लॉयर्स को ऑप सोसायटी
विजय विनोद साळवे, यश विनोद साळवे
समस्त पाखरे परिवार

## खाऱ्या पाण्याला सर्वोत्तम पर्याय

म्हणजेच अभय सेल्स मधील इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर...





ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011

# अहिल्यानगरची शान

असा जिवलग मित्र पुन्हा होणे नाही...



अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय
स्व.अरुणकाका बलभीमराव जगताप यांना
भावपूर्ण श्रध्दांजली

* दशक्रिया विधी *
रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी ७ वा.
अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे

: शोकाकूल :
राजेंद्र कांतीलाल चोपडा – सौ. नंदिनी राजेंद्र चोपडा
अमित राजेंद्र चोपडा – सौ. श्वेता अमित चोपडा
आरव चोपडा, अर्जुन चोपडा
समस्त चोपडा परिवार
चोपडा मोटर्स (L.L.P.) | चोपडा कन्स्ट्रक्शन्स
सथ्था कॉलनी, स्टेशन रोड, अहिल्यानगर

सर्व कामगार बंधु आणि भगिनींना जागतिक कामगार दिनाच्या शुभेच्छा !
या निमित्ताने

# इंडो आयरिश हॉस्पिटल

तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर. फोन 0241-2423336
मो. 9130423336 * 9860310001
तर्फे

# मोफत सर्वरोग तपासणी

दि. १ मे ते १० मे २०२५ रोजी स. १० ते ५ वा.
- सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत

Star Health, Sbi General Insurance, Oriental Health Insurance & All Tpa, National Insurance, Tata Aig General Insurance, ICICI Lombard, Bajaj Allianz, Reliance Insurance Company, Universal Sampo, Manipal Cigna, IFFCO TOKIO, HDFC ERGO, Medi Assist, Future Genrali

व इतर सर्व कॅशलेस इंशुरन्स उपलब्ध

* उपलब्ध सुविधा *
सर्व रोग निदान व उपचार

- जनरल सर्जरी (हार्निया, अपेंडीक्स व इतर सर्व शस्त्रक्रिया)
- कार्डियाक (कॅथलॅब, अॅन्जीओप्लास्टी)
- युरोलॉजी (डायलिसीस, किडनीस्टोन, प्रोस्टेट सर्जरी)
- मेडिसीन (डायबेटिस, हृदयाचे आजार, स्ट्रोक, ब्लडप्रेशर)
- ऑर्थोपेडिक (सांधेदुखी, पाठदुखी, सांधे प्रत्यारोपण)
- स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र (वंध्यत्व निवारण, वेदनाविरहित प्रसुती)
- बालरोग व नवजात रोगशास्त्र
- ऑन्कोलॉजी (सर्जरी व किमोथेरपी)
- पॅथॉलॉजी
- रेडिओलॉजी
- सिटीस्कॅन

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत योजना
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी
२४ तास आपत्कालीन व अॅम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध



**मनामध्ये घर करून गेले,**
**अश्रूंमधून शब्द उमटून गेले...**
**काकांचं कार्य अनमोल ठरलं,**
**जनतेच्या मनावर त्यांचं नाव कोरलं.**

अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय

# स्व. अरुणकाका जगताप

यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

✻ दशक्रिया विधी ✻
रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी ७ वा. अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे

✻ शोकाकुल ✻

**अरविंद गुंदेचा** – चेअरमन
**निलेश मेहेर** – व्हा. चेअरमन

✻ संचालक ✻

**संतोष बोथरा**   **सुनील मुनोत**   **संतोष बोरा**
**मेहुल भंडारी**   **नितीन पटवा**   **आनंद देसरडा**

✻ संचालिका ✻

**प्रमिलाबाई बोरा**   **शितल छाजेड**

✻ स्वी. संचालक ✻

**सतीश बोरा**   **सुनित मुनोत**   **नरेश गांधी**   **प्रीतम गांधी**

✻ व्यवस्थापक - **दिलीप कटारिया**   ✻ सह.व्यवस्थापक - **प्रणव कटारिया**

सर्व सभासद व कर्मचारी वृंद

**अहमदनगर इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑप. सोसायटी लि;**
नगर-पुणे रोड, केडगाव, अहिल्यानगर. फोन नं. ०२४१- २५५१५२८

---



**श्रध्दा व प्रेरणेचे मूर्तिमंत असणारे**
**अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय**

# स्व. मा. आ. अरूणकाका जगताप

यांना भावपूर्ण
श्रध्दांजली

●दु:खाकिंत●

Saideep GROUP
अहिल्यानगर, पुणे

**सुधीर निलेश चोपडा व परिवार**

ad magic

---

KAKA



काकांच्या छाये विना सर्व काही वाटे अपूर्ण..
कोणत्याही धनसंपती ने सुध्दा न होईल कधी ही पोकळी संपूर्ण..!

# आमचे आदर्श मार्गदर्शक व आधारस्तंभ

# स्व. मा. आ. अरूणकाका जगताप

**यांच्या प्रेमळ स्मृतीस**

**भावपूर्ण**
श्रध्दांजली

● **जगताप परिवाराच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत..** ●

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री प्रदिप पंजाबी**<br>हॉटेल संजोग | **श्री अरूण बोराटे**<br>हॉटेल सागर | **श्री राजेश एकाडे**<br>हॉटेल राज पॅलेस | **श्री कल्पेश परदेशी**<br>हॉटेल अमर पॅलेस |
| **श्री नंदकिशोर राऊत**<br>हॉटेल निमंत्रण | **श्री अविनाश मोरे**<br>हॉटेल पुजा | **श्री रोहित सरना**<br>हॉटेल काका ढाबा | **श्री राजेंद्र ससे**<br>हॉटेल दामोदर |
| **श्री दत्रातय रासकोंडा**<br>हॉटेल रेडीयन्स | **श्री राम भोर**<br>हॉटेल अरूण | **श्री किशन गायकवाड**<br>हॉटेल किर्ती किशन | |

ad magic



# देवा तुला शोधू कुठं

आदरणीय

**स्व. अरुणकाका बलभीमराव जगताप**

यांना

भावपूर्ण श्रद्धांजली!



•• दु:खांकित ••

अनिल जाधव

समस्त जाधव परिवार